विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/मंगळवार दि. १ ऑक्टेबर २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-२९५ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

**सुविचार**

शान्ति का चुम्बक बन जाइये ताकि आप अपनी ओर आकर्षित होने वाली अशान्त आत्माओं को शान्ति प्रदान कर सकें ।

# मराठा आरक्षण : शिंदे समितीचा अहवाल स्विकारला




मुंबई: लोकसभा निवडणुकीत महायुतीला मराठा आरक्षणाचा फटका बसला. मराठवाड्यात महायुतीला केवळ एक जागा मिळाली. भाजपची पाटी कोरी राहिली. मराठवाड्यातील मतदारांनी महायुतीला झिडकारलं. यानंतर आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुतीनं मराठा आरक्षण प्रश्नावर महत्त्वाचं पाऊल उचललं आहे. माजी न्यायमूर्ती शिंदे समितीनं तयार केलेला दुसरा आणि तिसरा अहवाल महायुती सरकारनं स्विकारला आहे.

कॅबिनेट बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मराठा आरक्षण प्रश्नावर माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीचा दुसरा आणि तिसरा अहवाल सरकारनं स्विकारलेला आहे. मराठा समाजाच्या नोंदी शोधण्यासाठी या समितीची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या समितीनं आपला पहिला अहवाल १८ डिसेंबर २०२३ रोजी सरकारकडे सुपूर्द केला. त्या नोंदींच्या आधारावर राज्य सरकारनं मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. पण आणखी नोंदी शोधण्यासाठी सरकारनं समितीला मुदतवाढ दिलेली होती.

विधानसभा निवडणुकीआधी महायुती सरकारनं निर्णयांचा सपाटा लावलेला आहे. आज झालेल्या कॅबिनेट बैठकीत ३८ निर्णय घेण्यात आलेले आहेत. आचारसंहिता लागू होण्यास काही दिवसांचा कालावधी असताना सरकारनं निर्णयांचा धडाका लावला आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी महायुती सरकारनं माजी न्यायमूर्ती संदीप शिंदेंच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती. या समितीनं मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागांचे दौरे केले. जुने दस्तावेज शोधून, त्यांचा अभ्यास करुन समितीनं अहवाल सादर केला. कुणबी म्हणून नोंदी असलेल्यांना कुणबी प्रमाणपत्रांचं वाटप करण्याचं काम याच अहवालाच्या आधारे करण्यात आलं.

शिंदे समितीनं शोधून काढलेल्या नोंदींमुळे मोजक्याच लोकांना आरक्षणाचा लाभ होत असल्याचा आक्षेप मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केला. त्यामुळे सरकारनं शिंदे समितीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय ३० जुलैला सरकारनं घेतला. या समितीनं आणखी पुरावे शोधून काढत ३० सप्टेंबरला म्हणजेच आज आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला. तो सरकारने स्विकारला आहे.

## राहुल गांधी महाराष्ट्रात

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज हे सा-यांचेच आराध्य दैवत आहेत. राज्यात काही दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचा किल्ल्यावर उभारलेला पुतळा कोसळला. त्या मुद्यावरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात विविध आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या. या प्रकारानंतर आता काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे महाराष्ट्रात येणार आहेत. ४ आणि ५ ऑक्टोबर असा दोन दिवसांचा त्यांचा दौरा असणार आहे. या दौ-यावर कोल्हापुरात त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण केले जाणार असल्याची माहिती आमदार सतेज ऊर्फ बंटी पाटील यांनी दिली.

(पान ७ वर)

# सोयाबीन अनुदान आज खात्यात



मुंबई : प्रतिनिधी- राज्यातील कापूस आणि सोयाबीन उत्पादकांच्या खात्यात सोमवार, दि. ३० सप्टेंबर रोजी १० हजार रुपये जमा होणार आहेत. राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज या संदर्भात घोषणा केली. खरीप हंगाम २०२३ मधील कापूस आणि सोयाबीन उत्पादक ६५ लाख शेतक-यांना २ हजार ५०० कोटी अर्थसहाय्य वितरीत होणार आहे. त्यामुळे शेतक-यांच्या खात्यात उद्याच रक्कम जमा होईल, असे मुंडे म्हणाले.

महाराष्ट्र कृषि विभागाकडून सन २०१०, २०२१ आणि २०२२ या वर्षात कृषि क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या शेतकरी आणि अधिका-यांचा सत्कार व पुरस्कार वितरण सोहळा महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री दादा भुसे, मंत्री दीपक केसरकर यांच्या उपस्थितीत वरळी डोम येथे पार पडला. या कार्यक्रमात कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी ही घोषणा केली.

राज्यातील जवळपास ९६ लाख कापूस व सोयाबीन उत्पादक शेतक-यांपैकी आधार लिंक असलेल्या ६८ लाख शेतक-यांना अनुदान मंजूर झाले आहे. यात प्रतिहेक्टरी ५ हजार रुपये २ हेक्टर मर्यादेत म्हणजेच जास्तीत जास्त १० हजार रुपये अनुदान मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी उद्या ६५ लाख शेतक-यांना २५०० कोटींचे वितरण होणार आहे, असे मुंडे म्हणाले.

# ‘माझं लातूर’ च्या आंदोलनास मजविप महानगर शाखेचा पाठिंबा

लातूर / प्रतिनिधी - गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या लातूरच्या जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न ऐरणीवर घेऊन , त्यासाठी निधीच न देणार्या शासनाच्या निषेधार्थ ' माझं लातूर ' चळवळीच्या भीक मागो आंदोलनास मराठवाडा जनता विकास परिषदेच्या लातूर महानगर शाखेने रविवारी जाहीर पाठिंबा दिला.

या संदर्भातील लेखी पत्र महानगर शाखेचे अध्यक्ष जयप्रकाश दगडे यांनी काल प्रसिद्ध केले असून , त्यावर मजविप अभ्यासगट प्रमुख ॲड. भारत साबदे, महेंद्र जोशी, सचिव प्रा. विनोद चव्हाण, ईश्र्वरचंद्र बाहेती, प्रकाश घादगिने, उस्मानभाई शेख, प्रा. एन.बी. रेड्डी, प्रा. बी.एस.पळसकर, प्रा. भालचंद्र येडवे, राजेंद्र वनारसे प्रभृतींच्या स्वाक्षर्या आहेत.

लातूरच्या नियोजित जिल्हा रुग्णालयाकरिता शासनाने परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या अखत्यारीतील लातूरच्या कृषी महाविद्यालयाची १० एकर जागा खरेदी करण्यासाठी जवळपास ३० कोटी ३३ लाख रु. चा निधी मंजूर केल्याचे शासकीय परिपत्रक प्रसृत केले होते. ही प्रक्रिया ६० दिवसांत पूर्ण करण्याचा सरकारी आदेशही होता. तथापि, मंजूर झालेल्या निधीतील फुटकी कवडीही सरकारने , शंभरावर दिवस उलटूनही , प्रत्यक्ष दिली नाही. सरकारच्या ह्या नाकर्तेपणाचा निषेध म्हणून माझं लातूरने मंत्र्यांचे मुखवटे लावून अभिनव असे भीक मागो आंदोलन सुरु केले. या आंदोलनास मजविप महापगर शाखेने पाठिंबा जाहीर केला आहे.



**पुणे : येथील भरती विद्यापिठात पलूस मतदारसंघातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि चेअरमन यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यकर्त्यांना लातूरचे खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांनी मार्गदर्शन केले. भारती विद्यापीठाचे वैभव आणि डॉ. विश्वजीत कदम यांचे परिश्रम आणि नियोजन यांची डॉ. काळगे यांनी प्रशांसा केली. यावेळी खा. सुप्रियाताई सुळे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण, खा. अमोल कोल्हे, उल्हास दादा पवार, लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख, निलेश जैन, विश्वंभर भोसले यांची उपस्थिती होती.**

# किमान देवाला तरी राजकारणापासून दूर ठेवा

नवी दिल्ली : तिरुपती लाडू वादावर सोमवारी (३० सप्टेंबर) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली यावेळी सर्वोच्च न्यायालयाने आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांना फटकारले. जुलैमध्ये आलेल्या अहवालावर दोन महिन्यांनंतर विधान का केले, अशी विचारणा न्यायालयाने केली. तसेच किमान देवाला तरी राजकारणापासून दूर ठेवा एवढी आमची अपेक्षा असल्याचे म्हटले.

तिरुमला येथील श्री व्यंकटेश्र्वर स्वामी मंदिरात प्रसाद (लाडू) बनवताना प्राण्यांच्या चरबीचा वापर केल्याच्या आरोपांची न्यायालयीन देखरेखीखाली चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने देवाला तरी राजकारणापासून दूर ठेवा, असे बजावून सांगितले.

लाडू बनवताना भेसळयुक्त तूप वापरण्यात आल्याचा पुरावा काय आहे, असा सवाल सुप्रीम कोर्टाने सुनावणीदरम्यान केला. निदान देवांना राजकारणापासून दूर ठेवलं जाईल, अशी आम्हाला आशा आहे. तिरुपती लाडू वादावर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, हा विश्र्वासाचा विषय आहे. जर भेसळयुक्त तूप वापरले गेले असेल तर ते अस्वीकार्य आहे.

न्यायमूर्ती बी. आर. गवई यांनी आंध्र प्रदेश सरकारला फटकारत तुम्ही या सर्व प्रकरणाच्या (पान ७ वर)




**काशी विश्वेश्वर मंदिर विशाल नगर लातूर येथे रविवार रोजी जगद्गुरू विश्वाराध्य जनकल्याण प्रतिष्ठानच्या वतीने शैक्षणिक शिष्यवृत्तीचे वितरण ष.ब्र.श्री १०८ शांतवीरलिंग शिवाचार्य महाराज व रविशंकर शिवाचार्य महाराज यांच्या शुभ हस्ते करण्यात आला.**

# एम.आय.टी. विश्वशांती विद्यापिठाचा समर्पित जीवन गौरव पुरस्कार गुरुबाबा महाराजांना जाहीर

**ॲड. शाम कुलकर्णी**

औसा- विज्ञान अध्यात्म आणि तत्वज्ञान जागतिक परिषदेचे औचित्य साधून संबंध वारकरी संप्रदायाचा ध्यास आणि श्र्वास असणाऱ्या अध्वर्य घराण्यातील सत्पुरुष म्हणून एम.आय.टी. विश्वशांती विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने सद्गुरु श्री. वीरनाथ मल्लनाथ महाराज संस्थान श्रीक्षेत्र औसाचे पाचवे पिठाधिपती सद्गुरु श्री. गुरुबाबा महाराज औसेकर यांना यावर्षीचा 'समर्पित जीवन गौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आला असून ३ऑक्टोंबर रोजी जागतिक परिषद सोहळ्यात पुणे येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



यासंबंधीची घोषणा व तसे निमंत्रण श्री. गुरुबाबा महाराज औसेकर यांना मिळाले असून संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्र्वर माऊली जन्मउत्सव सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष व श्री. संत जगद्गुरु श्री. तुकाराम महाराज यांचे ३७५ व्या वैकुंठ गमन सोहळा वर्ष पर्वात विज्ञान अध्यात्म आणि तत्वज्ञानाची सांगड असलेल्या (पान ७ वर)

# सायबर फ्रॉडमध्ये १७० सामिल; पुण्यासह ३२ छापे, २६ जेरबंद

नवी दिल्ली :- देशातील आणि जगभरातील नागरिकांना जाळ्यात ओढून पैसे लुबाडणा-या सायबर गुन्हेगारी नेटवर्कविरोधात सीबीयआने कारवाई केली. सीबीआयने २६ सप्टेंबर रोजी देशभरातील ३२ ठिकाणी छापे टाकले. सायबर फ्रॉडच्या माध्यमातून लोकांना फसवून पैसे लुबाडणा-या नेटवर्कमध्ये १७० जण सहभागी असल्याचे समोर आले असून, २६ प्रमुख आरोपींना अटक करण्यात आली. या प्रकरणात सीबीआयने पुण्यातून १० जणांना अटक केली.

एएनआय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, सीबीआयने




पुणे, हैदराबाद, अहमदाबाद आणि विशाखापटणमधील ३२ ठिकाणी छापे टाकले. २६ सप्टेंबर रोजी मध्यरात्री हे छापे टाकण्यात आले.

सीबीआयने केलेल्या छापेमारीमध्ये असे आढळून आले की, चार कॉल सेंटर्सच्या माध्यमातून १७० लोक या ऑनलाईन गुन्हेगारीच्या प्रकरणात सहभागी आहेत. यात प्रमुख आरोपी असलेल्या २६ जणांना सीबीआयने अटक केली.

सीबीआयने अटक केलेल्या प्रमुख आरोपींपैकी १० जणांना पुण्यातून अटक करण्यात आली. हैदराबादमधून ५ आरोपी आणि विशाखापटणममधून ११ आरोपींना अटक करण्यात आली.



# वीरशैव महासभाच्यावतीने शिष्यवृत्ती वाटप समारंभ

लातूर : श्री महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय वीरशैव महासभा शैक्षणिक मदत वितरण सोहळा संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूरचे माजी महापौर तथा माजी आमदार मा.श्री. विश्वनाथजी चाकोते हे होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री. माधवरावजी पाटील टाकळीकर, मा. ॲड. प्रा.बी. व्ही. मोतीपवळे सर, मा.श्री.प्रदीपजी वाले, श्री. प्रदिप दिंडीगावे, मा.प्रेरणाताई होनराव, प्राचार्य संजय गवई, प्रा. संतोष कोसगी , मा.सौ. छायाताई पैके, ॲड. ऋषीका पाटील चाकुरकर, पृथ्वीसिंग बायस, माणिकराव आलुरे, बलराज खंडोमलकेजी आदी मान्यवरांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनीहि शिकून मोठे व्हावे आणि गरीब विद्यार्थांना मदत व्हावी अशी आपेक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी व्यक्त केली. महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाचा निधी वाढवून गरजू विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त मदत करण्यासाठी प्रयत्नशिल राहणे गरजेचे आहे. असेहि त्या म्हणाल्या.

# मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यास शासनाची मंजुरी :गहिनीनाथ महाराज औसेकर

पंढरपूर (प्रतिनिधी)- श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरच्या आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यास होण्या-या अतिरिक्त खर्चास शासनाने मंजुरी दिल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांची सेवा मंजुर आकृतीबंधानुसार माहे जानेवारी, २०१९ पासून संरक्षित केली आहे. तसेच माहे जून, २०१९ पासून सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी लागू केली आहे. मात्र, आस्थापनेवरील खर्चास १०% ची मर्यादा असल्याने ५०%, ७५% व १००% महागाई भत्ता व ५% घरभाडे भत्ता देण्यात येत होता. तथापि, मंदिर समितीने सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षापासून आस्थापनेवरील सर्व कर्मचा-यांना २०३% महागाई भत्ता व १०% घरभाडे भत्ता लागू केला आहे. मात्र, दि.०३/०१/२०१९ ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीतील महागाई व घरभाडे भत्त्याच्या फरक दिलेला नव्हता. तसेच शासकीय कर्मचा-यांप्रमाणे वेतन व भत्ते देण्याबाबत कर्मचा-यांकडून वारंवार मागणी होत होती.

आषाढी एकादशी दिवशी म्हणजे दिनांक १७ जुलै रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे श्री विठ्ठल रूक्मिणी मातेची शासकीय महापूजा करण्यासाठी श्रीक्षेत्र पंढरपूरला आले होते. त्यावेळी आस्थापनेवरील कर्मचा-यांना सातवा वेतन



आयोग मिळणेबाबत चर्चा करून विनंती केली होती. त्यावर त्यांनी प्रस्ताव तयार करून शासनास सादर करावा, शासन सकारात्मक निर्णय घेईल असे आश्र्वासित केले होते. त्यानुसार मंदिर समितीच्या सभेत निर्णय घेऊन धर्मादाय आयुक्त यांच्या मंजुरीने शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तद्नंतर सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दि.२० सप्टेंबर रोजी मंत्रालय येथे व दि.२१ सप्टेंबर रोजी पुणे येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची समक्ष भेट घेऊन चर्चा केली होती. त्यास दि. ३० सप्टेंबर रोजी शासनाने मंजुरी दिली आहे.

मंदिरसमितीच्याआस्थापनेवर सद्यस्थितीत विविध संवर्गातील २२५ कर्मचारी कार्यरत आहे. या कर्मचा-यांना सध्या सहावा वेतन आयोग लागू आहे. आता शासनाच्या मंजुरीने ७ वा वेतन आयोग लागू होऊन प्रतिमहा ७ ते १० हजार इतकी भरघोस वेतनवाढ होणार आहे. त्यासाठी मंदिर समितीचा प्रतिवर्षी एक ते दिड कोटी इतका अतिरिक्त खर्च वाढणार आहे. याशिवाय, दि.०३/०१/२०१९ ते दि.३१/०३/२०२४ या कालावधीतील सहाव्या वेतन आयोगातील भत्त्याच्या फरकाची रक्कम देखील कर्मचा-यांना मिळणार आहे. याबाबत कर्मचा-यांकडून आनंद व्यक्त होत आहे. या कर्मचा-यांच्या सेवा १० ते ३० वर्षे झालेल्या आहेत असे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

समिती कर्मचा-यामार्फत श्री.विठ्ठल रूक्मिणीमातेचे पंढरपूरातील मुख्य मंदिर आणि मंदिरातील ३६ परिवार देवता, तसेच पंढरपूर शहर व परिसरातील २८ परिवार देवतांची मंदिरे यांचे व्यवस्थापन करण्यात येते. यासर्व देवदेवतांची पुजा-अर्चा, नित्योपचार, नैमत्तिक उपचार तसेच वर्षातील ४ उत्सव नियमितपणे पार पाडण्याची जबाबदारी कर्मचा-यांवर आहे. तसेच दर्शनरांग व्यवस्था, अन्नछत्र, गोशाळा, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता, पिण्याचे पाणी, चप्पलस्टँड, मोबाईल लॉकर, (पान ७ वर)

# राष्ट्रवादी शिक्षक संघाकडून भगवान खडके यांचा सत्कार

अहमदपूर दि.३०(बालाजी कारामुंगीकर) राष्ट्रवादी शिक्षक संघाकडून.. भगवान खडके यांचा सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यालय राचन्नावाडी शाळेच्या मुख्याध्यापक पदी मा.भगवान खडके यांची नियुक्ती



झाल्याबद्दल राष्ट्रवादी शिक्षक संघ चाकुरच्या वतीने त्यांच्या जन्मगावी नागेशवाडी बापुजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात तालुका अध्यक्ष प्रा.दयानंद झांबरे यांनी सत्कार केला.

यावेळी प्राचार्य महादेव मद्दे , प्रा. ज्ञानेश्वर चामे,प्रा बालाजी नलाबले, तालुका सचिव पत्रकार मधुकर कांबळे, कार्याध्यक्ष साहित्यिक वैजनाथ सुरनर,जगतसिंह चंदेले, इ उपस्थित होते.

# माहिती अधिकार दिनाची जनजागृती व्हावी

## पर्यवेक्षक राम तत्तापूरे यांचे प्रतिपादन

अहमदपूर दि.२७(बालाजी कारामुंगीकर): कायद्याची आमलबजावणी प्रथमता स्वीडनमध्ये १७६६ साली झाली. त्यानंतर सबंध जगामध्ये भारत हा माहिती चा कायदा लागू करणारा ५४ वा देश असल्याचे सांगून या माहितीच्या अधिकारामुळे देश आणि राज्यातील कामे अत्यंत पारदर्शी होऊन त्यात शासनाच्या महसूलाची मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात प्रशासन अधिक पारदर्शी होण्यासाठी माहितीच्या अधिकारा ची जनजागृती व्हावी असे आग्रही प्रतिपादन यशवंत विद्यालयाचे पर्यवेक्षक राम तत्तापूरे यांनी केले.

ते दि २८ सप्टेंबर रोजी आयोजित राज्य परिवहन आगारात आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनाच्या सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुख अमर पाटील, व्यासपीठावर प्रमुख अतिथी



म्हणून वाहतूक निरीक्षक भरत केदासे, वरीष्ट लिपिक योगेश भंगारे, हेड मेकॅनिक व्यंकट ठाकूर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना राम तत्तापूरे म्हणाले की, माहितीचा अधिकार भारतीय राज्यघटनेत मूलभूत अधिकार म्हणून समाविष्ट केला नसला तरी कलम ९१( १)(अ) अन्वये अभिव्यक्ती आणि भाषण स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराचे संरक्षण करतो असे त्यांनी सांगितले.

सोहळ्याचा अध्यक्षीय समारोप आगार व्यवस्थापक अमर पाटील यांच्या भाषणाने झाला.

कार्यक्रमाचा शुभारंभ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आला.

सूत्रसंचालन योगेश भंगारे यांनी तर आभार व्यंकट ठाकूर यांनी मांनले.

या सोहळ्याला राज्य परिवहन आगारातील कर्मचारी मेकॅनिक आणि प्रवासी बांधव मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राज्य परिवहन आगारातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी एस. टी. कर्मचारी उपस्थित होते.

# यशवंत ज्यु. कॉलेज, अहमदपूर येथे हिंदी दिवसानिमित्त डॉ. सुनिता चवळे यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे उद्घाटन

अहमदपूर दि. ३० (बालाजी कारामुंगीकर) येथील यशवंत ज्यु. कॉलेज येथे हिंदी दिवस भाषण स्पर्धा घेवून साजरा करण्यात आला. त्याचाच एक भाग म्हणून डॉ. सुनिता चवळे यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे फित कापुर उद्घाटन करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील यशवंत ज्यु. कॉलेज येथे हिंदी दिवस वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरा करण्यात आला. त्याचाच एक भाग म्हणून दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी दु. २.४५ वाजता टागोर शिक्षण समितीच्या सहसचिव, डॉ. एस.एस.एम. प्रतिष्ठानच्या सचिव प्रा.डॉ. सुनिताताई चवळे यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. सुनिता चवळे म्हणाल्या की, यशवंत ज्यु. कॉलेजमध्ये भित्तीपत्रकाचा खुप स्त्युत उपक्रम हिंदी दिवसानिमित्त राबविला गेला आहे. भित्तीपत्रकांमध्ये साहित्यिक स्वरूपाचा मजकूर असतो, त्यांना पोस्टर किंवा भित्तीपत्रक म्हणतात. भित्तीपत्रकांचा उपयोग शिक्षण



आणि साहित्य क्षेत्रात केला जातो. ज्युनियर कॉलेजचे विद्यार्थी ह्या वयात स्वतःची कविता, कहानी, लेख अश्या स्वरुपाचे साहित्य निर्माण करतात हे खरचं खुप वाखाणण्याजोगे आहे. भित्तीपत्रकांचा हेतू सार्वजनिक प्रदर्शन यशवंत मध्ये विद्यार्थ्यांनी स्वनिर्मित हे भित्तीपत्रक पदर्शन केले याबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करते असेही त्या शेवटी म्हणाल्या.

यावेळी उपप्राचार्य प्रा. सय्यद एम. यू., विज्ञान प्रमुख प्रा. दिनेश तोंडारे, कला प्रमुख प्रा. ननीर एस.आर., प्रा. रविशंकर पुणे, प्रा. नंदकुमार क्षिरसागर, प्रा. शिवशंकर चिद्रे, प्रा. शिवशंकर पाटील, प्रा. रवि इरफळे, प्रा. अनमोल पटवारी, प्रा. सुरेंद्र येलमटे, प्रा. घटकार एस. टी., प्रा. मलशेट्टे श्रीशैल्य, डॉ. बालाजी कारामुंगीकर, प्रा. राहुल देशमुख, प्रा. निळकंठ चिवडे, प्रा. स्नेहल बोधणे, युवराज पाटील, मोहन कांबळे आदिंची उपस्थिती होती.

सदरील भित्तीपत्रक तयार करण्यासाठी प्रा. शिवशंकर चिद्रे, प्रा. श्रीशैल्य मलशेट्टे. डॉ. बालाजी कारामुंगीकर, कृष्णा विजय पाचंगे, कु. स्नेहा उत्तम चौधरी, मनोज काशिनाथ गुणगुणे, शेख मुजन्ना, लष्करी हबीबा लियाकतखान, शेख आलिया फ ारुख, बनसोडे पायल, नंदिनी सतिष ढोबळे, शेख सुमय्या ताजोद्दिन, मोहन कांबळे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी भित्तीपत्रक तयार करण्यासाठी ज्या विद्यार्थ्यांनी सहयोग दिली त्यांचा पुष्प देवून सत्कार करण्यात आला.

# बा. ह. वाघमारे सरांना सेवानिवृत्तीचा निरोप

खंडाळी तालुका अहमदपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक माननीय बा. ह. वाघमारे सर हे प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होत आहेत. व्यासंगी अभ्यासक, मृदभाषी, हाडाचा शिक्षक आणि एक प्रेमळ मित्र आणि मार्गदर्शक अशी कितीतरी विशेषणे सरांना कमी पडावीत. सातत्याने स्वतःला अध्यापन, लेखन आणि सामाजिक कार्यात सरांनी झोकुन दिले आहे. ग्रामीण भागात प्रदीर्घकाळ सेवा द्यावी लागली तरी कोणतीही तक्रार न करता मन लावून अध्यापनाचे कार्य त्यांनी केले. शाळेने आणि संस्थेने सोपविलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडली. विद्यार्थ्यांना सामाजिक व्यवस्थेची जाणीव व्हावी म्हणून सातत्याने क्षेत्रभेटी, अभ्यास दौरे यांचे आयोजन केले. सरांच्या संग्रहात सामाजिक विषयांवर अनेक ग्रंथांचा व अनुभवाचा साठा आहे. ज्या काळात ॉींलिश चा जन्मही झाला नव्हता त्या काळात सरांनी लोकशाहीर वामनदादा कर्डक यांच्या गीताचा संग्रह त्यांनी केला आहे. तो नुकताच प्रकाशनाच्या वाटेवर आहे. या संदर्भात त्यांना खूप मोठी आवड ही आहे. कुठलाही गाजावाजा न करता आपल्या कार्यात स्वतःला गुंतवून ठेवण्याची विलक्षण



हातोटी त्यांच्यामध्ये आहे. वयाने मोठे असूनही कधीही त्याची जाणीव त्यांनी मला होऊ दिली नाही. वयाचं अंतर आमच्या मैत्रीत कधी दिसले नाही. अनेक कार्यक्रमामध्ये आणि अकादमीक समित्यांमध्ये एकत्रित काम करण्याची संधी मला मिळाली. माझ्या ग्रंथावर सातत्याने आणि एखाद्या विषयावर दीर्घकाळ चर्चा करणे हा आमचा आवडता छंद. नवीन काही लिहिले की एकमेकांना वाचून दाखविणे हे आज तर नित्याचेच झाले आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे सर वरून अत्यंत गंभीर वाटत असले तरी त्यांच्यामध्ये एक विनोद वीर देखील लपलेला आहे. आम्ही ज्या ज्या वेळी भेटतो त्या त्यावेळी उशिरापर्यंत निखळ हास्य आणि गप्पा यात केव्हा वेळ निघून जातो कळत नाही. सर व्यवसायातून निवृत्त होणार आहे परंतु निवृत्ती हा त्यांचा स्वभाव नाही. सेवानिवृत्तीनंतरही अनेक गोष्टींमध्ये ते स्वतःला गुंतवणार आहेत, यावरही आमची गेल्याच महिन्यात चर्चा झाली. सुरुवातीला घरातील सर्व कामे व जबाबदाऱ्या आटोपून नंतर सामाजिक कार्यात व साहित्य चळवळीत स्वतःला झोकून देणार आहेत.

सरांना आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य लाभो या सदिच्छा.

**प्रा. डॉ. नारायण कांबळे,**
अहमदपूर

## तहसील कार्यालय जळकोट
(शाखा दंडनीय)

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.२७/०९/२०२४

### जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार मल्लीशे सदानंद शिवराज वय ३९ वर्षे रा. जगळपुर बु. ता. जळकोट, जि. लातूर यांचा जन्म मौजे जगळपुर बु. ता. जळकोट जि. लातूर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक १०/१२/१९८५ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील मल्लीशे सदानंद शिवराज यांची जन्म दिनांक १०/१२/१९८५ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मल्लीशे सदानंद शिवराज यांचा जन्म दिनांक १०/१२/१९८५ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु मल्लीशे सदानंद शिवराज यांचा जन्म दिनांक १०/१२/१९८५ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय जगळपुर बु. ता. जळकोट येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दि. २७/०९/२०२४ रोजी दिले. पुढे नेमलेली तारीख २८/१०/२०२४

सही/-
**तालुका - दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार, जळकोट**

प्रत : १. **ग्रामपंचायत कार्यालय, जगळपुर यांचे नोटीस बोर्डावर डकविणे करीता.**

सही/-
**तालुका - दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार, जळकोट**

# स्पर्धा परीक्षा केंद्राचे उदघाटन समारोह संपन्न




हडोळती ३० (नागसेन गायकवाड) येथील क.तु.पवार महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा केंद्राचे उदघाटन समारोह संपन्न झाला

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रा.पी.टी. पवार सरांच्या अमृतमहोत्सवी वर्ष व कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोळती व श्रट-उ अंतर्गत स्पर्धा परीक्षा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे उदघाटन समारंभाचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दीपक बच्वेवार सर तर स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रमुख प्रा.डॉ.गंगथडे आर.डी. व खट-उ विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.माकणीकर यु.एस.हे विचार मंचावर उपस्थित होते.याप्रसंगी अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ.दिपकजी बच्वेवार सर विद्यार्थ्यांना संबोधीत करीत असताना म्हणाले की, स्पर्धा परीक्षा ही काळाची गरज झाली आहे.या विषयी विद्यार्थ्यांनी जागरूक होऊन स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून जिवनात यशस्वी व्हावे असे त्यांनी आव्हान केले.

प्रास्ताविक प्रा.डॉ. गंगथडे आर.डी.यांनी केले.तसेच या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.डॉ. बालाजी भंडारे यांनी केले.तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. लोहकरे पी.एम.यांनी मानले.

यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक यशवंत नियमित वाचा

# शहीद भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त फुले महाविद्यालयात वृक्षारोपण



अहमदपूर दि. ३०(बालाजी कारामुंगीकर) शहीद भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त फुले महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर तालुक्यातील किनगांव येथील महात्मा फुले महाविद्यालयात शहीद भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या विग क्र २ च्या प्रांगणामध्ये शनिवारी बोधीवृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव तथा प्राचार्य डॉ . बबनराव बोडके , उपप्राचार्य डॉ . विठ्ठल चव्हाण , पत्रकार संजीवकुमार देवनाळे , प्रा बालाजी आचार्य, प्रा . डॉ . भारत भदाडे , प्रा . डॉ अनंत सोमवंशी , प्रा . संजय जगताप , प्रा . डॉ . बळीराम पवार , प्रा डॉ विरनाथ हुमनाबादे , डॉ . सदाशिव वरवटे , अखिल शेख , इंद्रदेव पवार , शिवाजी हुंबाड , अनिल भदाडे आदींची उपस्थिती होती .यावेळी वृक्षारोपण करून ट्री गार्ड बसविण्यात आले.

**मनाचे सौंदर्य हेच खरे सौंदर्य**

# क.तु.पवार महाविद्यालयामध्ये हिंदी दिवस साजरा

हडोळती ३० (नागसेन गायकवाड) क.तु.पवार महाविद्यालयामध्ये हिंदी दिवस समारोह संपन्न झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रा.पी.टी. पवार सरांच्या अमृतमहोत्सवी वर्ष व कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हाडोळती यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवस समारोह हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रा. डॉ. दीपक




बच्वेवार सर तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. तुकाराम कदम व हिंदी भागाचे विभाग प्रमुख डॉ. सादिक शेख हे विचार मंचावर उपस्थित होते.

यावेळी डॉ. सादिक शेख सरांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविका मधून हिंदी भाषेचे महत्व विशद केले.तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे प्रा.तुकाराम कदम यांनी हिंदी भाषेचे महत्व विद्यार्थ्यांना विशद केले. याप्रसंगी अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ. दिपकजी बच्वेवार सर विद्यार्थ्यांना संबोधीत करीत असताना म्हणाले की, हिंदी भाषा ही राष्ट्र भाषा असून सर्व जाती,धर्मांना एकत्र करते. त्यामुळेच देशाला एकसंघ ठेवण्याचे कार्य करते. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ.गोविंद शिळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.दिगांबर गायकवाड यांनी मानले.यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## कबीरवाणी

**खाय पकाय लुटाय के,**
**छाडियेय तू एंठ ।**
**लेना होय सो लेई ले,**
**उठी जात है पैंठ ॥**

**भावार्थ:** संत कबीर सांगतात की, मानवाने स्वकर्मावर विश्वास ठेवून स्वतःची कामे स्वतः केली पाहिजे. मानवाने स्वतः शिजवून भोजन केले पाहिजे तसेच स्वतः कमवून दान केले पाहिजे. दुसऱ्याची सेवा करण्यात मग्न असले पाहिजे. कारण हा जो देह आपल्या मनाशी निगडीत असलेला जीव आहे ना तो दोन दिवसांचा पाहुणा आहे. त्यामुळे या जिवनामध्ये जे घ्यायचे ते घ्या या सत्संग मैदानात मानवी शरीररूपी चेंडू पुन्हा कधीच हाती लागणार नाही. याचाच अर्थ असा या शरीररूपातून जेंव्हा आत्मा बाहेर निघून जाईल सांगता येणार नाही.

म्हणून मानवाला मिळालेल जीवन हे क्षणभंगुर आहे. या जिवनात जे काही चांगले आहे ते घेत जीवन जगले पाहिजे. तुम्हाला कोणीही मागुन सुख देणार नाही. यासाठी तुम्हाला तुमचे सुख निर्माण करावे लागणार आहे आणि ते निर्माण केलेले सुख तुम्ही वाटु पण शकता. दुसऱ्यांच्या सेवेमध्ये जीवन अर्पण केल्याने मनाला एक प्रकारची शांती प्राप्त होत असते. यासाठी सदैव कर्मरत राहणे आणि दान करने हा मानवाचा स्वभाव असला पाहिजे. जीवन संपल्यावर किंवा शरीर जर्जर झाल्यावर कर्म करण्याचा किंवा दान करण्याचा विचार करुन काहीच फायदा होत नाही.

**डॉ. बालाजी गोविंदराव कारामुंगीकर**
मो. ९८२३११२९०७

# यशवंत धाराशिव जिल्हा

मंगळवार दि. ०१ ऑक्टोबर २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com


## प्रधानमंत्री ग्रामसडक भाग तीन साठी ४२ कोटी ४९ लाख निधी मंजूर - खा राजेनिंबाळकर

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग ३ अंतर्गत सन २०२४-२५ वर्षासाठी रस्त्यासाठी ४२ कोटी ४९ लाख रुपयांचा निधी मंजुर करण्यात आली असल्याची माहिती खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी दिली. तसेच रस्त्याची कामे तात्काळ मार्गी लावण्याबाबत प्रशासनला सुचना देण्यात आल्या आहेत.

प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत एमडीआर ९ ते वांगी -देवंग्रा ता भूम १० कोटी ९२ लाख रुपये तर लोहारा (बु) ते कानेगाव ६ कोटी रुपये व आलुर ते वरनाळवाडी ते राज्य सरहद्द रस्त्यासाठी ८ कोटी २४ लाख रुपये तसेच एन.एच. ६५ जेकेकुरवाडी ते महाराणा प्रताप तांडा ६ कोटी ३९ लाख रुपये व एमडीआर ९ ते लोणी - कपिलापुरी १० कोटी ९४ लाख रुपये एकुण ४२ कोटी ४९ लाख रुपये एवढी भरीव तरतुद ग्रामीण भागातील वरील रस्त्या करण्यात आली आहे. या निधीतुन वरील रस्ते दुरुस्त होणार असल्यामुळे या मार्गावरील वाहतूक सुसाह्य



ठरणार आहे.

# जिल्ह्यातील ३ लाख ७१ हजार शेतकऱ्यांना सोयाबीन अनुदान वितरणाचा मिळणार लाभ - आ. पाटील

## बँक खात्यामध्ये वितरण प्रक्रिया सुरु

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकर्यांना खरीप २०२३ मधील अनुदानाचे वितरण दि.३० सप्टेंबरपासून सुरु झाले आहे. प्रती हेक्टर ५ हजार रूपयांप्रमाणे जिल्ह्यातील ३ लाख ७१ हजार शेतकर्यांच्या खात्यावर हे अनुदान जमा होण्यास सुरू झाले आहे. राज्यातील महायुती सरकार शेतकर्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे आ राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

खरीप २०२३ मध्ये सोयाबीन आणि कापसाच्या बाजार भावातील दर कमी झाल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. शेतकर्यांच्या मदतीसाठी महायुती सरकारने सोयाबीन आणि कापूस उत्पादकांना प्रती हेक्टर ५ हजार रूपयांचे आर्थिक सहाय्य अनुदान म्हणून जाहीर केले होते. त्याबाबतचा शासन निर्णय देखील त्यावेळीच जारी करण्यात आला होता. ई-पीक पाहणीची अट रद्द केल्यामुळे अनुदानापासून वंचित राहिलेल्या शेतकर्यांनाही त्याचा लाभ झाला. जिल्ह्यातील एकूण ३ लाख ७१ हजार २०२ शेतकर्यांना सोयाबीनच्या अनुदानापोटी सोमवारपासून प्रती हेक्टर ५ हजार रूपयांप्रमाणे २ हेक्टरच्या मर्यादेत अनुदान मिळण्यास सुरूवात झाली असल्याची माहिती आ पाटील यांनी दिली आहे. तसेच जिल्ह्यातील ४ लाख २९ हजार शेतकरी ई-पीक पहाणीनुसार अनुदानास पात्र ठरले आहेत. त्यापैकी ३ लाख ७१ हजार २०२ शेतकऱ्यांनी त्यांचे समंतीपत्र दिलेले आहे. पहिल्या टप्प्यात संमतीपत्र दिलेल्या



एकूण शेतकऱ्यांपैकी २ लाख ९७ हजार २०२ शेतकऱ्यांच्या थेट खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यास प्रारंभ झाला आहे. उर्वरित ७४ हजार शेतकर्यांची ई-केवायसी होणे अद्याप बाकी आहे. त्यामुळे त्यांच्या खात्यावर ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही अनुदानाची रक्कम जमा केली जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. ई-पीक पाहणी न केलेले आणि ७/१२ उतार्यावरही पिकाची नोंद नसलेले साधारणपणे ५ टक्के शेतकरी या अनुदानापासून वंचित राहिले असल्याची माहिती आहे. तशा काही तक्रारीही आपल्याकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यांनाही अनुदान मिळवून देण्यासाठी आपला पाठपुरावा सुरू असल्याचे आ पाटील यांनी नमूद केले आहे.

### ७२ तासांची मुदत वगळली !

प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत यंदाच्या हंगामात २३ ते २७ सप्टेंबर दरम्यान अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकरी काढणीपश्चात विमा कंपनीला त्याबाबत माहिती देत आहेत. २७ सप्टेंबर रोजी रात्री पोर्टल बंद असल्यामुळे अनेकांना नुकसानीची सूचना देता आली नाही. ज्या कालावधीत पोर्टल बंद होते, त्या कालावधीत नुकसानीची सूचना देण्यासाठी ७२ तासांची असलेली मुदत गृहित धरली जाणार नाही, याची नोंद जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी घ्यावी, असे आवाहनही आ पाटील यांनी केले आहे.

## प्रा. विजया बेलकेरी यांचा सेवानिवृत्तीबद्दल संस्थेच्यावतीने सपत्नीक सत्कार

मुरूम दि. ३० (प्रतिनिधी) – येथील भारत शिक्षण संस्था, उमरगा संचलित कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागात कार्यरत असलेल्या प्रा. विजया बेलकेरी यांचा महाविद्यालयाच्या सभागृहात नियतवयोमानानुसार सेवापूर्ती सोहळा दि.३० सप्टेंबर रोजी पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक तानाजी फुगटे होते. यावेळी संस्थेचे संचालक रामभाऊ इंगोले, उमरगाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले, सेवानिवृत्त प्राचार्य दत्तात्रय इंगळे, प्रा. डॉ. महेश मोटे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक किसन खंडागळे, प्रा. जीवन जाधव, भालकीचे सत्यसाई पब्लिक स्कूलचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर यम्मे, सचिव ज्योती यम्मे, बिदरच्या डॉ. स्नेहा यम्मे, पुणेचे अनिल बेलकरी, अशोक बेलकेरी, रामशेट्टी बेलकेरी, वैजनाथ पंचगल्ले आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. तर शुभांगी जाधव, सिमरन शेख, भाग्यश्री गवंडी, गौरी लाटे यांनी गिताद्वारे स्वागत केले. यावेळी संस्थेतर्फे प्रा. विजया बेलकेरी व प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले या सपत्नीक पूर्ण आहेर देऊन पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. संजय अस्वले, किसन खंडागळे, डॉ. महेश मोटे, वैजीनाथ पंचगल्ले, धनंजय बनजगोळे, जीवन जाधव, शमशाद मुजावर, लक्ष्मी चव्हाण, शुभांगी जाधव, शिफा पटेल आदींनी मनोगतातून भावना व्यक्त केल्या. सेवानिवृत्तीच्या सत्काराप्रसंगी कृतज्ञता व्यक्त करताना मनात अनेक भावना असून जे सहकारी, मार्गदर्शक



आणि वरिष्ठांनी माझ्यावर विश्वास ठेवून मला या शैक्षणिक प्रवासात साथ दिली. संस्थेने मला काम करण्याची संधी दिली, त्यातून मी खूप काही शिकले आणि माझ्या जीवनात यशस्वी झाले. सेवानिवृत्ती म्हणजे एका प्रवासाची समाप्ती असली, तरी ती नव्या पर्वाची सुरुवातच आहे. मला या पुढेही खूप काही करण्याची इच्छा आहे. मी महाविद्यालयात विविध उपक्रमात विद्यार्थ्यांसोबत घालवलेले क्षण, कठीण प्रसंग, यशस्वी आणि मिळवलेले सहकारी बांधव कायम स्मरणात राहतील. मी संस्था, सहकारी, मित्रपरिवार व कुटुंबीयांप्रती मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करते. याप्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी, वेगवेगळ्या क्षेत्रातील संस्था, संघटना, पाहुणे व मित्रपरिवारांकडून सत्कार करण्यात आला. डॉ. रविंद्र गायकवाड, प्रा. गणपत बेलकोने, प्रा. जवाहर चनशेट्टी, प्रा. सुजित चिकुंद्रे, प्रा. रोहन हराळकर, प्रा. प्रकाश चव्हाण, प्रा. गजानन उपासे, विनय इंगळे, श्रीकांत शिंदे, अवधूत गुरव आदींनी पुढाकार घेतला. या सोहळ्याचे प्रस्ताविक प्राचार्य गोविंद इंगोले यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेषेराव राठोड व प्रा. किसन माने यांनी तर आभार प्रा. वर्षा हुलगुंडे यांनी मानले. यावेळी कर्नाटक राज्यातील नातेवाईक, जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांसह शहरातील विविध शाळा व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व सर्व शाखेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय बौद्ध महासभेच्या उमरगा तालुकाध्यक्षपदी कांबळे तर सचिवपदी सुरवसे

उमरगा दि.३० (प्रतिनिधी) – भारतीय बौद्ध महासभेच्या उमरगा तालुकाध्यक्षपदी अनंतकुमार कांबळे यांची तर तालुका सरचिटणीसपदी संतोष सुरवसे यांची निवड दि.२९ सप्टेंबर रोजी करण्यात आली.

उमरगा येथे भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्ष राजश्रीताई कदम यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन उमरगा तालुका नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये तालुका कोष्याध्यक्ष सोनाली कांबळे, संस्कार उपाध्यक्ष हनुमंत कांबळे, संस्कार सचिव राजेंद्र सुर्यवंशी व रोहित गायकवाड, महिला उपाध्यक्ष उषा गायकवाड, सचिव सुरेखा कांबळे व बाळूबाई कांबळे, पर्यटन उपाध्यक्ष बलभीम गायकवाड, सचिव जीवन सूर्यवंशी व जालंधर कांबळे, संरक्षण उपाध्यक्ष बाळासाहेब भोसले, सचिव उध्दव गायकवाड व सुज्ञानबाई कांबळे, कार्यालयीन सचिव सिद्राम भोसले व संघटक म्हणून संगीता भीम सोनकांबळे, शिरीषकुमार



कांबळे, सुग्रीव कांबळे, अविनाश भालेराव यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद डोईफोडे यांनी तर आभार जिल्हा पर्यटन सचिव उमेश सुरवसे यांनी मानले. या बैठकीस जिल्हा सरचिटणीस विद्यानंद वाघमारे, कोषाध्यक्ष कुमार ढेपे, संस्कार जिल्हा उपाध्यक्ष विजय बनसोडे, पर्यटन जिल्हा उपाध्यक्ष विश्वास पंडागळे, डॉ. प्रा.विवेकानंद वाहूळे, संघटक बाळासाहेब बागडे, ब्रह्मानंद गायकवाड व विद्याताई कांबळे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लाडकी बहिण योजनेला विरोध करणारांना जागा दाखवून द्या- आ. राणाजगजितसिंह पाटील




धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – माता भगिनींना सर्वार्थाने सक्षम करण्यासाठी महायुती सरकारने अनेक महत्वाच्या योजना हाती घेतल्या आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण ही त्यातीलच एक महत्वपूर्ण योजना आहे. राज्यातील कोट्यवधी माता भगिनींना त्याचा लाभ होत आहे. योजना यशस्वी ठरत असल्यामुळे साहजिकच विरोधकांच्या पोटात दुखत आहे. तर मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेला विरोध करणाऱ्यांना आगामी विधानसभा निवडणुकीत जागा दाखवून द्यावी, असे आवाहन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील अंबाबाई मंदिराच्या सभागृहात स्त्रीशक्तीचा सन्मान अन् मातृशक्तीला आधार.....मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील लाभार्थी माता भगिनींच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीकृष्ण महिला बचत गटाच्या मीरा महाबोले उपस्थित होत्या. तर प्रमुख पाहुण्या म्हणून भाग्यलक्ष्मी बचत गटाच्या जिजाबाई जाधव व माजी जिल्हा परिषदेच्या उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते तुळजाभवानी देवी, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब, सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. महिलांच्यावतीने आ पाटील व अर्चनाताई पाटील यांचा भव्य सत्कार करण्यात आला. पुढे बोलताना आ पाटील म्हणाले की, आपल्या परिसरातील १० हजार मुला-मुलींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी माझे प्रयत्न सुरू असून नळदुर्ग आणि परिसरात केलेल्या व होऊ घातलेल्या अनेक महत्वपूर्ण कामांबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. तर नळदुर्ग शहरात ५ एकर जागेवर भव्य व राज्यातील क्र. १ ची बसवसृष्टी उभारण्यात येणार असून त्यासाठी ५ कोटी रूपये मंजूर झाले आहेत. तसेच हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे स्मारकही उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर मराठवाडा मुक्तिसंग्रामचा देदिप्यमान इतिहास व त्यावेळी हौतात्म्य दिलेल्या शहिदांचा सन्मान राखण्यासाठी भव्य मराठवाडा मुक्तिसंग्राम स्मारकही साकारले जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच मराठवाड्याच्या मुक्तीसाठी शहिद झालेले, पंजाबचे भूमिपुत्र असलेले शहिद बचित्तर सिंग यांच्या कार्याची महती या स्मारकाच्या माध्यमातून उपलब्ध होणार असल्याची त्यांनी सांगितले. याबरोबरच मस्लिम समाजासाठी भव्य शादिखाना, बौद्ध समाजासाठी सभागृह आदींसह नळदुर्गच्या ऐतिहासिक भुईकोट किल्लूयात आणखी विकास कामे प्रस्तावित असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्य व देशातून अधिकाधिक पर्यटक येथे कसे येतील ? त्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. एकंदरीत या सर्व कामांच्या माध्यमातून नळदुर्ग व परिसराचा चेहरामोहरा बदलून खर्या अर्थाने नळदुर्गचा विकास सिध्द करणार असल्याचेही आ पाटील यांनी यावेळी सांगितले.

नळदुर्गमध्ये लवकरच अप्पर तहसील कार्यालय सुरु होत आहे. पुढील काळात नळदुर्ग येथे स्वतंत्र तहसील कार्यालय आणि नळदुर्ग शहराला तालुक्याचा दर्जा मिळावा यासाठी आपले प्रयत्न असणार आहेत. महायुती सरकारने मुलींसाठी मोफत उच्चशिक्षण, लखपती दिदी योजने अंतर्गत १ लाख रुपयांपर्यंतची मदत, बचत गटांचे सक्षमीकरण, रोजगार निर्मिती योजने अंतर्गत कर्ज रकमेवर ३५ टक्क्यांपर्यंत वाढीव अनुदान, अन्नपूर्णा योजने अंतर्गत वर्षाला ३ मोफत गॅस सिलिंडर, आदींसह इतर योजना मातृशक्तीला सक्षम करण्यासाठी सुरू केल्या आहेत. त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा महायुतीलाच मतदान करावे, असे आवाहन आ. पाटील यांनी केले. यावेळी अर्चनाताई पाटील यांनीही शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती उपस्थित महिलांना दिली.

आ. पाटील यांच्या हस्ते कविता पुदाले, उद्योजक कल्पना गायकवाड, बचत गटाच्या मीराताई महाबोले, वैद्यकिय सेवा देणाऱ्या डॉ. स्वाती पाटील, सामाजिक कार्यकर्त्या शाहेदाबी सय्यद, अक्षरवेलच्या अध्यक्षा शिल्पा पुदाले, जलतरणपटू अश्वेता गायकवाड यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक माधुरी पद्माकर घोडके यांनी केले. अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते लाडक्या महिलांचा सन्मान म्हणून उपस्थित हजारो महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुशांत भूमकर, नय्यर जहागीरदार, रणजितसिंह ठाकूर, श्रमिक पोतदार, धीमाजी घुगे, गणेश मोर्डे, अक्षय भोई, सागर हजारे, बंडू पुदाले, पांडूरंग पुदाले, पद्माकर घोडके, सुनील बनसोडे, जमन ठाकूर यांच्यासह नळदुर्ग शहर भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## जिल्हा रुग्णालय पतसंस्थेच्या प्रशासक मोटे यांनी सभेतून केले पलायन

### प्रशासक पतीची सभासदांना अरेरावी व धमकी



धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – उस्मानाबाद जिल्हा रुग्णालय कर्मचारी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा अर्ध्यावरतीच ठेवून प्रशासक एम.ए. मोटे यांनी केले पलायन. तर प्रशासक पती व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत कर्मचारी असलेले अतुल आगलावे यांनी सभासदांना अरेरावीची भाषा वापरीत तुमच्यावर गुन्हे दाखल करतो अशी धमकी देऊन या सभेत आग लावण्याचे काम दि.२९ सप्टेंबर रोजी केले. तसेच आगलावे हे या पतसंस्थेचे सभासद नाहीत किंवा त्यांचा या पतसंस्थेची कुठल्याही प्रकारचा संबंध नाही, हे विशेष म्हणावे लागेल.

उस्मानाबाद जिल्हा रुग्णालय कर्मचारी सहकारी पतसंस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा धाराशिव शहरातील ज्ञानेश्वर मंदिर शेजारी असलेल्या स्वप्नराज फंक्शन हॉलमध्ये आयोजित करण्यात आली होती. या सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेच्या वरिष्ठ लिपिक तथा प्रशासक एम.ए. मोटे तर मोटे यांची मुलगी, धाराशिव येथील उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाचे सहाय्यक निबंधक अंबिलपुरे, याच कार्यालयाची महिला शिपाई सरस्वती मोरे, लिपीक सविता मोरे व सहकार विकास बोर्डाचे सदस्य जाधव आदी उपस्थित होते.

प्रारंभी दीपप्रज्वलन करून सभेची सुरुवात करण्यात आली. सभा सुरू होताच माजी चेअरमन संजय मुंढे यांनी सभेची नोटीस वेळेवर व मुदतीत एकाही सभासदाला दिलेली नाही. फक्त शासकीय प्रक्रिया उरकण्यासाठी दि.१७ नोव्हेंबर रोजीच्या दैनिक एकमत या वृत्तपत्रामध्ये दिली होती. परंतू एकाही सभासदाला नोटीस दिलेली नाही. तर मागील वर्षाचे रेकॉर्ड पूर्ण नाही, असे आपण म्हणत आहात. त्यामुळे संस्थेची आर्थिक परिस्थिती कशी आहे ? ते समजून येऊ शकत नसल्यामुळे आम्ही पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकास मान्यता देऊ शकत नाहीत, असा विषय ठराव बुकामध्ये घ्या. तसेच पोट नियम दुरुस्ती करून कार्यकारी संचालक पद बंद करण्याचे सांगितले असता तुम्ही शिपाई आहात, तुम्हाला काय कळत नाही. त्यामुळे तुम्हाला एकापेक्षा जास्त प्रश्न विचारता येणार नाहीत. तुम्ही माजी चेअरमन आहात तुम्हाला बघून घेईन, अशी धमकीत दिली. तसेच त्यांनी एकाही प्रश्नांचे समाधानकारक उत्तर दिले नाही किंवा कुठलाही विषय ठराव पुस्तकात मांडला नाही. त्यांनी थेट बर सभेतून खुर्चीवरून उठून पलायन केले. दरम्यान, दरवाज्यापाशी प्रशासक मोटे त्यांचे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत कर्मचारी असलेले पतीसह वर्ग ४ कर्मचारी इतर २ अनोळखी व्यक्तींनी उभा राहून सभासदांना अरेरावीची भाषा वापरत शिवीगाळ करीत बघून घेईन अशी धमकी दिली. त्यामुळे सभा अर्ध्यावरतीच सोडून संबंधित प्रशासक व इतरांनी पलायन केले. प्रमुख पाहुणे म्हणून असलेले आंबीलपुरे, लिपिक व शिपाई हे या मोठे यांना साथ देत होते. त्यानंतर सर्व सभासदांनी अर्धा तास थांबून घडलेल्या प्रकारावर चर्चा करून पुढे कोणती पावले उचलायची ? याचा निर्णय घेण्यात आला.

यावेळी तज्ञ संचालक जावेद शेख, माजी संचालक बाबासाहेब पवार, जगदेवी तोडकरी, बालाजी कुंभार, दयाबाई बलवंडे, जीवन मदाळे, गुरुनाथ घाडगे, सभासद राम वाघमारे, मनीषा मिसाळ, अमर परमार, रशीद काजी मृणाल देशपांडे, रवी शितोळे आदींसह महिला व पुरुष सभासद उपस्थित होते.

# उपप्राचार्य डॉ. कुलकर्णी यांचा सेवानिवृत्तीनिमीत्त सपत्नीक सत्कार

उमरगा दि.३० (प्रतिनिधी) – येथील आदर्श वरिष्ठ महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ. सुरेश कुलकर्णी यांचा सेवापूर्तीनिमित्त श्रमजीवी परिवाराच्यावतीने त्यांचा गौरव दि.३० सप्टेंबर रोजी करण्यात आला.

येथील आदर्श महाविद्यालयाच्या प्राणी शास्त्र विभागाचे विभाग प्रमुख तथा उपप्राचार्य डॉ. सुरेश कुलकर्णी हे नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झाले आहेत. आदर्श महाविद्यालयात त्यांनी सलग ३३ वर्ष प्राणीशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून अध्यापनाचे कार्य केले. सन २००२ पासून त्यांच्यावर महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. सलग २२ वर्षापासून त्यांनी उपप्राचार्यपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.



श्रमजीवी परिवार व आदर्श महाविद्यालय यांच्यावतीने त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांचा गौरव संस्थेचे सचिव रामकृष्णपंत खरोसेकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संचालक मल्लीनाथ दंडगे, शंकुतलाताई खरोसेकर, साधनाताई कुलकर्णी, प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर, प्राचार्य डॉ. विजयकुमार सरपे, प्राचार्य धनंजय खोंडे, प्राचार्य शैफन शेख, प्राचार्य भीमाशंकर सारणे, उपप्राचार्य राम माळगे, मुख्याध्यापक शिवराज औसेकर, अनिल सगर सह आदींची प्रमुख उपस्थिती होती. विठ्ठल रुक्मीणीची मूर्ती भेट देऊन डॉ. सुरेश व साधना कुलकर्णी यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना खरोसेकर म्हणाले की, शिक्षण संस्थेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी निष्ठेने व तत्परतेने कार्य केल्यास संस्थेची शैक्षणिक प्रगती होते. श्रमजीवी शिक्षण संस्थेने संस्थेच्या विविध विद्या शाखेत काम करणाऱ्या सर्वच शिक्षक, प्राध्यापक व कर्मचारी यांच्यावर विश्र्वास ठेवल्यामुळेच श्रमजीवी शिक्षण संस्थेचा शैक्षणिक विकास शक्य झाला आहे. नितिमता साफ ठेवा ईश्र्वर कधीच कोणाला काहीच कमी पडू देत नाही असे सांगितले. तसेच श्रमजीवी शिक्षण संस्था ही राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक मानण्यात येत असल्यामुळे या संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा व्यक्तीमत्व विकास साध्य झाला आहे. कोणत्याही शिक्षण संस्थेचे कर्मचारी संस्था चालकांच्या हृदयातून कधिच निवृत्त होत नसतात. श्रमजीवीला त्यागाची परंपरा लाभली आहे. शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सामान्य मुलामुलींना गुणत्तेचे शिक्षण देऊन सुसंस्कारीत पिढ्या घडवा असे आवाहन त्यांनी केले. तर प्राचार्य डॉ. दिलीप गरुड म्हणाले की, निरपेक्ष भावनेने केलेल्या प्रत्येक कार्यात यश नक्कीच लाभते. कोणतेही कार्य निरपेक्ष भावनेने करून यश प्राप्ती करा असे आवाहन त्यांनी केले. तसेच सत्कारमूर्ती कुलकर्णी यांनी श्रमजीवी परिवाराचे ऋण व्यक्त केले. यावेळी प्रा. डॉ. शौकत पटेल, प्रा.डॉ. धनंजय मेनकुदळे, प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. बालाजी मोरे यांनी तर सुत्रसंचालन प्रा. डॉ. लक्ष्मण बिराजदार यांनी व आभार प्राचार्य डॉ. राम सोलंकर यांनी मानले.

# शिरूरआनंतपाळ तहसिल कार्यालया बाहेर मुद्रांक विक्रेत्याकडुन लुट

## संबधित विभागाचे दुर्लक्ष, परवाना रद्द करण्याची मागणी

**प्रशांत तांबोळकर**

शिरूर आनंतपाळ : येथील तहसील कार्यालय बाहेर मुद्रांक विक्री करणारे मुद्रांक विक्रेत्याच्या एकाधिकारशाहीमुळे नागरिक, शेतकरी व विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. मुद्रांक घेण्याकरिता गेल्यावर १०, २०, ५० ते १०० रुपये अतिरिक्त द्यावे लागत असल्याने जन सामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. याकडे मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे.

शेतकरी ते विद्यार्थ्यांपासून सर्वच घटकातील सामान्य माणसाचा मुद्रांकाशी (स्टॅम्प पेपर) संबंध येतो. विविध प्रमाणासाठी, डोमेसाइल सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व, जातीचा दाखला, सौदा पावती, करारनामा, प्रतिज्ञापत्र, खरेदी खत, वाटणी पत्र, तसेच कर्ज घेण्याकरिता स्टॅम्प पेपरचा उपयोग होतो. मात्र मूळ किमतीपेक्षा अधिक दराने मुद्रांकांची विक्री करून सामान्यांची अडवणूक केली जात असल्याच्या तक्रारी शिरूरआनंतपाळ येथील मुद्रांक विक्रेत्याच्या बाबतीत तक्रारी वाढल्या आहेत.

सोमवारी (दि. ३० ) रोजी आमच्या प्रतिनिधीने तहसील कार्यालयास भेट देऊन मुद्रांक विक्रेत्याची पोलखोल केली. शासनाच्या कृषी विभागाने शेतकर्याच्या बॅंक खात्यावर पिक नुकसानी पोटी पाच हजार रुपये देण्याचे घोषीत केले असुन तलाटी कार्यालयात जेंन्ट खातेदार व मयत झालेल्या नातेवाईकाचे वारस प्रमाण म्हणुन शंभर रुपयाच्या स्टंप पेपरवर लोटरी करुण देण्यासाठी कागदपत्राची शेतकरी जुळवाजुळव करत असुन तहसिल कार्यालयाबाहेरील मुद्रांक विक्रेते शंभर रुपयाच्या स्टंप पेपर सर्रास १३० रुपयाला विक्री करत असुन त्यांना कमीशन मिळत असतांनाही शेतकरी विद्यार्थाकडुन आगावु पैशाची लुट करत असल्याचे दिसुन आले. याबाबत त्याला विचारणा केली असता व १३० रुपयांचे पक्के बिल मागितले असता त्याने देण्यास स्पष्ट नकार दिला. आम्हाला परवडत नसल्याने आम्ही वीस -तीस रुपये अतिरिक्त घेत असल्याचे त्याचे म्हणणे होते. कमिशन मिळते तरी अतिरिक्त पैसे एकीकडे शासन मुद्रांक विक्रेत्यांना कोषागार मधून मुद्रांक खरेदी दरम्यान तीन टक्के कमिशन देत असते तरी सुद्धा मुद्रांक विक्रेता शंभर रुपयांच्या स्टॅम्प मागे वीस ते तीस रुपये तर ५०० च्या मागे पन्नास रुपये व हजारच्या स्टॅम्प मागे शंभर रुपये अधिकचे मागून नागरिकांची सर्रास लूट करीत आहेत. याबाबत दुय्यम निबंधकाचे मुद्रांक विक्रेत्यासोबत अर्थपुर्ण संबध असल्याचे बोलले जात आहे.

### मुद्रांक विक्रेत्याजवळ दरपत्रक लावण्याची मागणी

**मुद्रांक विक्रेत्याकडून नागरिकांची व विद्यार्थ्यांची होत असलेली आर्थिक लूट लक्षात घेता मुद्रांक विक्रेत्याला मुद्रांक खरेदीदाराने किती रुपयाच्या स्टॅम्पसाठी किती रुपये द्यावे व कोणत्या कामासाठी किती रुपयाचे मुद्रांक लागेल. नागरिकांनी अधिकचे पैसे न दिल्यास अडवणूक करणाऱ्या मुद्रांक विक्रेत्याची तक्रार करण्यासाठी संबंधीत अधिकार्याच्या मो.न. टाकुण सूचनांचे फलक लावण्यात यावे अशी मागणी विद्यार्थी शेतकरी व पत्रकार संघठणेनी मागणी केली आहे.**



**उदगीर येथे महा विकास आघाडीची बैठक संपन्न उदगीर जळकोट तालुक्यामध्ये नागरिकाच्या प्रश्नासाठी महाविकास आघाडी त्यांच्या दारी संवाद यात्रा काढण्यात येणार आहे या बैठकीला महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.**

# लिंगायत समाजाचा उदगीरात भव्य वधुवर मेळावा उत्साहात संपन्न

उदगीर -लिंगायत महासंघाच्या वतीने उदगीरात रविवार दिनांक २९सप्टेंबर २४ रोजी वीरशैव लिंगायत समाजाचा भव्य राज्यस्तरीय वधुवर मेळावा भगीरथ मंगल कार्यालयात उत्साहात संपन्न झाला. यात महाराष्ट्रातील अनेक भागातून, कर्नाटक, तेलंगणाच्या विविध भागातून शेकडो वधुवरांनी व पालकांनी हजेरी लावली होती.



या लिंगायत महासंघाच्या सहाव्या वधुवर मेळाव्यासाठी औसा हिरेमठ संस्थानचे शांतवीर शिवाचार्य महाराज,लातूरचे खासदार डॉ शिवाजीराव काळगे, लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा सुदर्शनराव बिरादार,माजी आमदार सुधाकर भालेराव,माजी आमदार मनोहर पटवारी,हावगी स्वामी महाविद्यालयाचे संस्था उपाध्यक्ष व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवकुमार हसरगुंडे,परभणी जिल्हा परिषद माजी मुख्यकार्यकारी अधिकारी मल्लिकार्जून करडखेलकर,तसेच उदगीर विधानसभा मतदारसंघाचे संभाव्य युवा उमेदवार इंजि विश्वजीत गायकवाड,युवा उद्योजक स्वप्नील जाधव,कृषि उत्पन्न बाजार समिती उदगीरचे सभापती शिवाजीराव हुडे,पंचायत समिती सभापती. प्रा शिवाजी मुळे, काँग्रेसचे उदगीर तालुकाध्यक्ष कल्याण पाटील, शिवसेनेचे तालुकाप्रमुख चंद्रकांत टंगेटोल, शहरप्रमुख संतोष पंचाक्षरी, मनसे जिल्हाप्रमुख संजय राठोड,अरुण पाटील,शिभप शिवराज नावंदे गुरूजी , डॉ संतोष बिरादार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाची सुरुवात निलंगा अनुभव मंटपच्या महिला व लिंगायत महासंघाच्या अध्यक्ष सौ संगिता भुसनुरे, सरचिटणीस सौ वैशाली व्होनाळे ,यांनी ईष्टलिंगपुजा केली.

यावेळी लिंगायत महासंघाचे प्रदेश सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील, कालापाटील, तालुकाध्यक्ष चंद्रकांत सिरसे,शहराध्यक्ष भिमाशंकर शेळके, जिल्हा उपाध्यक्ष बसवराज ब्याळे,लक्ष्मण रोडगे, शिरिष रोडगे, बापुराव शेटकार संगशेट्टी बिरादार, राजकुमार वडले, अशोक कडोळे,संजय शिवशेट्टे, शिवशंकर पाटील,राजाराम पाटील, कालिदास सिरसे,शांतवीर मुळे,प्रभुराज कप्पीकेरे, प्रा.प्रकाश करेप्पा राजकुमार वडले, जिल्हा संघटक काशिनाथ मोरखंडे, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत कोरे, गणेश पटणे,चाकुर तालुका अध्यक्ष सुभाष शंकरे संजय पाटील,देवणी शहराध्यक्ष विजयकुमार लुल्ले,धिरज माकणे, निलंगा तालुक्यातील पदाधिकारी तालुकाध्यक्ष चंद्रकांत डांगे सरचिटणीस अशोक काडादी,एन आर स्वामी,व्होनाळे गुरुजी,प्रभाकर डोके, सुर्यकांत पत्रे, धाराशिव जिल्हाध्यक्ष शंकरराव पाटील, जिल्हा उपाध्यक्ष वैजनाथ जट्टे, यांच्यासह संघटनेचे लातूर ,नांदेड, धाराशिव जिल्ह्यातील असंख्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी लिंगायत महासंघाच्या जळकोट तालुकाध्यक्षपदी शंकर धुळशेट्टे, जळकोट तालुका संघटकपदी बालाजी शिवशेट्टे तर कापसे यांची तालुका उपाध्यक्ष तर देवणी तालुकाध्यक्ष म्हणून राजकुमार मुरगे यांची तर जिल्हाउपाध्यक्षपदी शेषेराव मानकरी यांची तसेच शिरुर अनंतपाळ तालुकाध्यक्ष म्हणून शिवाजी किडींले यांची निवड प्रा सुदर्शनराव बिरादार सर यांनी केली.व अनेक गावाच्या शाखा काढण्यासाठी बिरादार सर यांच्या तारखा घेण्यात आल्या.

# आनंदी व सुखी जीवनाची गुरुकिल्ली

१) प्रस्तावना :- आनंद देणे आनंद घेणे, सहकार्य देणे सहकार्य करणे, स्वतः हसणे दुसऱ्यास हसविणे, सुख देणे सुख घेणे, प्रेम देणे प्रेम घेणे अशा प्रकारे प्रेम या शब्दात सारे विश्र्व सामावलेले आहे. प्रेमामुळे दुसऱ्याचे मन जिंकु शकते. प्रेम आणि भक्ती या भावनेच्या जादुने कठोरताही कोमल बनते. प्रेम हे कुसुमापेक्षा कोमल व वज्रापेक्षा ही कठोर असते. प्रेम हा संसार वृक्षाचा सुंगधीत मोहर आहे. वात्सल्य त्याचे फळ आहे. प्रेम आणि निती (प्रति आणि निती) या दोघी बहीणी आहेत.

प्रेम म्हणजे मंत्र, जादू, सर्वस्व. प्रेम म्हणजे एखादी गोष्ट हवीहवीशी वाटणे. प्रेम म्हणजे प्रिय वस्तूत बुडून जाणे, प्रेम म्हणजे पौर्णिमेचे शुभ्र शितल चांदणे, प्रेम म्हणजे गरज आणि भावना यांचे मिलन, प्रेम म्हणजे जीवन सागराच्या भरतीची सिमा, निसर्गाचा एक सनातन स्वभावधर्म, आयुष्याच्या वृक्षाला येणार बहर, प्रेम म्हणजे अहिंसा, प्रिती, भक्ती, त्याग, साक्षात सेवा, प्रेम म्हणजे जीवनाला चालना व बुध्दीला प्रेरणा, दोन हृदयांचे एकत्रिकरण दोन मनांचे गोड मिलन, प्रेम म्हणजे एक विशिष्ट मनस्थिती, एक अक्षय व नित्य वस्तू, दोन आत्म्यांना परस्परात विलीन होण्यासाठी वाटणारी ओढ.

प्रेम म्हणजे आयुष्याचे उद्यान बनून त्यास प्रफुल्लीत करणारी चंद्रकला. प्रेम म्हणजे स्नेह, स्नेह म्हणजे तेल, स्नेह पाण्यात लवकर फैलावते, तद्वतच प्रेम फैलावते. प्रेम म्हणजे भावनांचा महासागर, जीवनातील सर्वात प्रभावी शक्ती, जीवनाचा संपूर्ण विकास, संसारात दुःख पहाता पर्वता येवढे याचे विस्मरण करणारी कला. प्रेम म्हणजे गुलाबाचे फुल, फुलात सुगंध असतो व भोवताली काटे असतात तसेच प्रेमात आनंद असतो परंतु भोवताली संकटे असतात.याच प्रमाणे संसारात सुख आहे आनंद आहे. तसे दुःखरूपी काटेही आहेत. या दुःखातून बाहेर पडण्यासाठी वृध्दत्वाचे नियोजन करणे आवश्यक आहे. २) नियोजनाची त्रिसुत्री :- या पृथ्वीतलांवर जन्माला आलेल्या (काही अपवाद वगळता) प्रत्येक व्यक्तीला बालपण, तारुण्य व वृध्दत्व या ३ अवस्थेतून जाऊन मृत्युला सामोरे जावे लागते, हे तित्रकालबध्द सत्य आहे. विज्ञानाने कितीही प्रगती केली तरी अद्यापपावेतो वृध्दत्व व मृत्यु टाळता आला नाही. जी बाब टाळता येत नाही तिचा स्विकार करून धैर्याने तोंड देणे हाच शहाणपणाचा मार्ग असतो.

वृध्दत्वाला सामोरे जाणे नक्कीच कष्टदायक बब आहे. परंतु नियोजनबध्द प्रयत्न केल्यास वृध्दत्व बऱ्याच प्रमाणात सुसह्य होऊ शकते. या नियोजनामागे ३ प्रमुख उद्दिष्टे डोळ्यासमोर हवीत. १) शारीरिक क्षमता टिकविणे. २) मनःस्वास्थ्य सांभाळणे. ३) आर्थिक स्वावलंबन साधणे. या त्रिसुत्रीचा वापर करून आपण वृध्दत्त्वावर मात करु शकतो. परंतु हे नियोजनबध्द प्रयत्न वृध्दत्व येण्यापूर्वी खूप अधी सुरु करावे लागतात.

सदर नियोजनबध्द प्रयत्न सुरु करणे करिता योग्य वेळ म्हणजे आपली चाळीशी ओलांडण्याचा काळ, वयाच्या चाळीशी पर्यंत मुलामुलींची शिक्षणे आटोपून ती नोकरीत स्थिरावली असतात. नोकरीत उच्चपदे मिळत गेल्याने त्यांचा धडपडीचा काळ संपून बैठे काम वाढते. उत्पन्नाचे प्रमाण वाढल्यामुळे आर्थिक स्थैर्य लाभले असते. घरात टी.व्ही असतोच त्यात बराच वेळ जातो. घरोघरी वाहने असल्यामुळे पायी चालणे बंद होते. नेमकी हिच वेळ सावध होऊन वार्धक्याला सामोरे जाण्याकरिता नियोजनबध्द प्रयत्न सुरु करणे करिता योग्य असते. आता निर्धारित ३ उद्दिष्टये डोळ्यासमोर ठेवून कोणते प्रयत्न करावेत याकडे वळूया.

३) शारीरिक क्षमता टिकविणे :-

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीयांचे सरासरी वयोमान ४० वर्षाच्या आसपास होते. आज ते ६० वर्षापेक्षा अधिक झाले आहे. आयुष्यमान जरी वाढले तरी आजार संपले नाहीत. फक्त आजाराचे स्वरुप बदलले. जंतुजन्य आजारांना नक्कीच आळा बसला आहे. तसेच शल्यक्रियेतील प्रगतीमुळे इंद्रियबदलासारख्या अवघड शस्त्रक्रिया बिनधोक झाल्या आहेत. परंतु रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, लठ्ठपणा, सांधेदुखी इत्यादी आजार झपाटयाने वाढत आहेत. हे जीवनशैलीचे आजार टाळण्याकरीता आपली शारीरिक क्षमता तसेच रोग प्रतिकार शक्ती वाढविणे व ती वार्धक्यापर्यंत टिकविणे गरजेचे असते. याकरिता नियमित व्यायाम व आहार नियंत्रण या जोडगोळीची कास धरणे जरूरी आहे. नियमित पायी चालणे हा सर्वोत्तम व बिनखर्चाचा व्यायाम आहे. याकरिता दिवसभरातून किमान । तास स्वतः करिता काढणे अत्यावश्यक असते. दररोज किमान १/२ तास मोकळ्या हवेत जलदगीतने चालणे गरजेचे असते. चालताना लांबलांब पावले टाकीत हात मागे पुढे करावेत, चालताना गप्पा मारू नये. चालण्याचा वेळ २२० मधून आपले वय वजा करून व त्याला २/३ ने गुणुन जो आकडा येईल तितके नाडीचे डोके पडावेत ही मर्यादा सांभाळावी. चालताना दम लागत असल्यास तज्ञ डॉक्टर. चा सल्ला घ्यावा. व्याधीमुळे घराबाहेर पडू न शकणाऱ्या व्यक्तींनी वॉकिंग मशिनचा वापर करावा.

वृध्दत्वात प्रमुख समस्या सांधेदुखीची असते विशेषतः गुडघे, घोटे, खांदे, पाठ, कंबर यांची विशेष काळजी घेणे जरूरी असते. या करिता सांध्याचे सोपे पुरक व्यायाम नियमित करणे गरजेचे असते. आजकाल सर्वत्र हास्य योग मंडळे कार्यरत आहेत. त्याठिकाणी हे पूरक व्यायाम केले जातात. चालणे व सांध्याचे पूरक व्यायामाच्या जोडीला विविध प्राणायाम, ऑंकारसाधना व ध्यानधारणा याची जोड दिल्यास आपली रोग प्रतिकार शक्ती व मनः स्वास्थ्य सुधारण्यास मदत होते. वेळ सकाळचीच असावी असे बंधन नाही. प्रत्येकाने आपल्या सोयीनुसार वेळ निवडावी. गृहिणीनी घराच्या स्वच्छतेची कामे करण्याची सवय मोडू नये. त्यामुळे शारीरिक क्षमता टिकविता येते. बागकाम करणे हा देखील चांगला पर्याय आहे.

४) आहार नियंत्रण :- शारीरिक क्षमता व रोग प्रतिकार शक्ती टिकविण्यासाठी नियमित व्यायामाला संतुलित आहाराची जोड देणे आवश्यक असते. आपला आहार संतुलित आहे किंवा नाही हे ओळखण्याकरीता आपल्या उंचीच्या मानाने आपले वजन योग्य आहे किंवा नाही हे बघणे गरजेचे असते. पोटाचा घेर वाढणे हे हृदयविकाराला आमंत्रण असते. तेव्हा पोटाचा घेर पुरुषात ९० से.मी. तर महिलांत ८० से.मी. चे आत असावा. आहार शक्यतो शाकाहारी असावा. मांसाहरी व्यक्तीने लाल मांस (बकरी, मेंढी, बैल, डुक्कर)

व अंडयातील पिवळा बलक टाळावा. अन्नसेवन सावकाश चावून करावे. जेवताना गप्पा व दूरदर्शन टाळावे. जेवणाकरिता छोटी ताटली व चमच्याचा वापर करावा, लहान घास घ्यावेत जेणे करुन गरजेपेक्षा अधिक अन्नसेवन होणार नाही. जेवताना वरुन मीठ घेऊ नये. लोणच्याचा खार टाळावा. तेल-तुपाचा वापर दिवसभरात २-३ चमचे असावा. वनस्पतीतुपाऐवजी गायीचे तूप वापरावे. साय काढलेले दूध व त्यापासून तयार केलेले दही, ताक याचा वापर करावा. साखर, मिष्टान्न, मैद्याचे पदार्थ, तळीव पदार्थ यांचा अतिरेक टाळावा.

आहारात चोथ्याचे प्रमाण पुरेसे असावे, या करिता न चाळलेली कणिक व हातसडीचा तांदूळ वापरावा. पालेभाज्यांच्या देठांचा पण वापर करावा. मोसमात उपलब्ध असलेले एक फळ रोज खावे. फळांचा रस पिण्याऐवजी फळ चावून खावे. पातळ सालीची फळे सालीसहीत खावे. अतिउष्मांक असलेले पण निकृष्ट दर्जाचे उदा. जंक फूड, मैद्याचे बेकरी पदार्थ, गोळ्या, चॉकलेटस्, आईस्क्रीम, फसफसणारी शीतपेये, फरसाण यांचा अतिरेक टाळावा. दोन वेळा आंकठ जेवण्यापेक्षा तोच आहार ४ वेळा विभागून घ्यावा. पोटाचा १/२ अन्नकरिता, १/४ भाग हवेकरिता वापरावा. भाग पालेभाज्य व फळभाज्यांचा रस आहारात घेण्याची सवय केल्यास शिजविलेला आहार कमी करता येतो. त्यामुळे प्रथिने, जीवनसत्वे, क्षार भरपूर प्रमाणात प्राप्त होतात. उष्मांकाचा अतिरेक टाळला जातो. त्याचप्रमाणे सकाळच्या न्याहरीकरिता मोड आलेल्या कडधान्याची न शिजविलेली पौष्टिक भेळ घ्यावी, यावर कोथिंबीर, मेथीची पाने, गाजर, टमाटे, काकडी यांचे छोटे काप टाकावे. फोडणी देऊ नये, चवीकरिता जीरेपूड, मीरपूड, सैंधव मीठ वापरावे. यावर दही घेता येते. चावण्याचा प्रश्र्न असेल तर मिक्सरमधून काढावी. आहारात विविधता असावी. रंगीत पालेभाज्या, फळभाज्या व फळांचा समावेश असावा. वरील सोप्या उपायाचा वापर केल्यास संतुलित आहाराचा प्रश्र्न सोडविता येतो.

५) मनःस्वास्थ्य सांभाळणे :- शरीराप्रमाणे मन देखील आजारी पडू शकते. मन निरोगी असेल तर शरीर निरोगी राहते. मानसिक ताणताणावामुळे केस गळणे व पिकणे, भूक न लागणे, निद्रानाश, पोटात व्रण (अल्सर) हाणे, रक्तदाब वाढणे, मधुमेह, हृदयविकार इत्यादी शारीरिक आजार उद्भवू शकतात.

वार्धक्यात स्मरणशक्ती कमी होते परंतु जुन्या आठवणी वरचेवर डोके वर काढतात. ज्येष्ठांनी आपल्या भूतकाळाची उजळणी न करता तसेच भविष्याची विनाकारण चिंता न करता वर्तमानात जगावे मनस्वास्थाकरिता फावला वेळ आपल्या आवडत्या छंदात घालवावा. उदा. वाचन, लिखाण, गायन, वादन व बागकाम इत्यादी छंद जपावे, स्मृतिभ्रंश टाळणे करिता शब्दकोडी सोडवावीत.

तसेच ध्यानधारणा, नामजप, सत्संग इ. उपक्रम मनःशांती करिता खुप उपयुक्त ठरतात. घरात मुलगा, सून, नातवंडे, यांचेशी सुसंवाद राखणे खूप महत्वाचे असते एकटेपणा त्रासदायक ठरतो. मन करारे प्रसन्न। सर्व सिध्दीचे कारण।।

६) आर्थिक स्वावलंबन :-

नोकरी, व्यवसायातून निवृत्ती घेतल्यावर आर्थिक ओघ मंदावतो. वाढतया महागाईमुळे दैनंदिन जवीन जगणे दुरापास्त होते. वार्धक्यकाळात पुढची पिढी हमखास आर्थिक मदत करेलच याची खात्री देता येत नाही. तेव्हा वार्धक्याकरिता लागणारी आर्थिक तरतूद आपल्या तरूण पणातच करणे जरूरीचे असते. आपल्या उत्पन्नाचा ठराविक भाग विविध बचत योजनात गुंतविल्यास वार्धक्यकरिता पुंजी साठविता येते. फसवणूक टाळणे करिता माहितगार बचत एजंटची जरूर मदत घ्यावी. आपले राहते घर आपल्या हयातीत आपल्या नावावरच राहिल याची काळजी घ्यावी. अन्यथा बेघर होण्याची पाळी येऊ शकते. वरीलप्रमाणे कितीही पूर्व तयारी केली तरी वार्धक्यात शारीरिक समस्या अटळ असतात. त्याकरिता डॉक्टरच्या सल्ल्याने नियमितपणे आवश्यक वैद्यकिय चाचण्या उदा. रक्तदाब, रक्तशर्करा, लिपिड प्रोफाईल, अस्थिघनता, डोळे तपासणी इ. चाचण्या नियमित कराव्यात व वेळचे वेळी औषधोपचार घ्यावेत. सारांशाने नियोजनबध्द प्रयत्नाने आपले वार्धक्य सुसह्य ठेवण्याचा प्रयत्न करावा व शेवटचा दिवस गोड करावा. आणि आनंदाने व सुखाने जास्तीत जास्त वर्ष जगावे हिच अपेक्षा.

**********

**– प्राचार्य डॉ. शिवाजी सगर**
उदगीर
मो.९३०९७५०५२१

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com

## परंडा येथे रिपाइं तालुका कार्यकारिणी बैठक पडली पार



धाराशिव दि. ३० (प्रतिनिधी) – सातारा येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) ६७ वा वर्धापन दिन दि.३ ऑक्टोबर रोजी साजरा करण्यात येणार आहे. त्याच्या पूर्वतयारी व नियोजनासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीस चांगला प्रतिसाद मिळाला.
परंडा येथे रिपाइंचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस संजयकुमार बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली परंडा येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या कार्यालयात बैठक घेण्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष उत्तम ओव्हाळ, सोशल मीडिया आयटी सेल जिल्हाध्यक्ष आकाश बनसोडे, तालुकासंपर्क प्रमुख दादा सरवदे , तालुका उपाध्यक्ष जयराम साळवे, संजीवन भोसले, भास्कर ओव्हाळ, बाबा शिंदे, विकास गोमासे, संतोष चतुर, पप्पु सरवदे, दादासाहेब बागडे, धनाजी यशवंद, दशरथ हावळे, रंदील गणेश, बापूराव हावळे, काशिनाथ सातपुते, बाजीराव मांजरे, बप्पा चौधरी, केलास शिंदे, रामा कांबळे, बाळासाहेब चतुर, संजय यशवंद, विक्रम भोसले, दशरथ लोंढे, सुभाष वाकचौरे, सुजल कांबळे, संजय वाघचौरे, निखिल कांबळे, रोहित राऊत आदींसह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वृक्ष लागवडी बरोबरच त्याच्या संगोपनाची चळवळ महत्त्वाची – आ. कैलास पाटील







## धाराशिव फाउंडेशनचा देशाला दिशा देणारा पर्यावरणपूरक उपक्रम

## १० हजार विविध देशी वृक्षांचे केले रोपण

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – वृक्ष लागवड करणे व लावलेल्या सर्व वृक्षांचे जतन करणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. सर्वत्र वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते मात्र ती जतन होतात किंवा नाही याकडे दुर्लक्ष होत आहे. ही बाब पर्यावरणासाठी अतिशय धोक्याची असल्यामुळे धाराशिव फाउंडेशनच्या माध्यमातून धाराशिव तालुक्यातील वडगाव (सि) येथील सिद्धेश्वर मंदिरालगत १० एकर क्षेत्रांवर ३ हजार विविध देशी प्रजातींच्या १० हजार वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात आली. त्या रोपांचे जतन संगोपन करण्यासाठी ठिबक बसविण्यात आले असून यापैकी एक देखील वृक्ष जळणार नाही. तर लावलेल्या सर्व झाडांचे संगोपन नक्की होणार आहे. त्यामुळे वृक्षारोपण करून लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याची चळवळ सर्वत्र वाढली पाहिजे असे आवाहन आमदार कैलास पाटील यांनी दि.२९ सप्टेंबर रोजी केले.

धाराशिव तालुक्यातील वडगाव (सि) येथील सिद्धेश्वर मंदिरालगत असलेल्या ओसाड जागेवर देशी असलेल्या ३ हजार प्रजातींच्या १० हजार वृक्षांचे धाराशिव शहर व परिसरातील नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, बाळासाहेब , पुणे येथील वनश्री पुरस्कार प्राप्त देवराई फाउंडेशनचे रघुनाथ ढोले, लालासाहेब माने, नांदेड येथील ऋत फाऊंडेशनचे नांदेड शिवशंकर चापुले, पिंपरी चिंचवड येथील आरटीओ इन्स्पेक्टर प्रकाश मुळे, पुणे येथील निसर्ग राजा मित्र जीवांचे राहुल घोलप, सुहास कडू, सुधाकर चव्हाण, एम.डी. देशमुख, काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, उपाध्यक्ष प्रशांत पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख सतीश सोमाणी, शिवसेना शहरप्रमुख सोमनाथ गुरव, तेली समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवि कोरे आळणीकर, वृक्षांचे मार्गदर्शक ढोले उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार पाटील म्हणाले की, गेल्या वर्षापासून वृक्ष लागवड करण्याचे नियोजन करण्यात येत होते. कारण लावलेली वृक्ष जगावीत तसेच नागरिकांना देशी व औषधीं गुणधर्म असलेल्या वनस्पतींची ओळख होऊन ती जोपासता यावीत याकडे विशेष लक्ष दिले गेले. तर जमिनीचे सपाटीकरण करून अंतर्गत रस्ते झाडे लावण्यासाठी त्याची आखणी करण्यात आली. यामध्ये पिंपळ, चिंच, आवळा, फणस, जांभूळ, वड, करंजीसह सर्व जाती धर्मात पवित्र असलेल्या वृक्षांसह ३ हजार विविध प्रजातींचा समावेश करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. वृक्ष लागवड दरवर्षी मोठ्या प्रमाणात सर्वत्र केली जाते. मात्र लावलेली ती झाडे पुढे जळाली की वाढली ? याकडे कोणीच लक्ष देत नाही. वृक्षतोडीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असून लागवड करून ती जतन करण्याचे प्रमाण घटत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून ती जतन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तर खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर म्हणाले की, सर्वात वृक्ष लागवड कमी असलेल्या जिल्ह्यांमध्ये राज्यात लातूर नंतर धाराशिवचाच नंबर लागतो. त्यामुळे प्रत्येकाने झाडे लावून ती जगविली पाहिजेत. झाडे लागवड करून ती मोठी झाल्यानंतर त्याकडे पाहिल्यानंतर जे समाधान लाभते, ते पैशात किंवा इतर कुठल्या संपत्तीत मोजता येत नसल्याचे त्यांनी नमूद केले. आज लावण्यात आलेल्या १० हजार वृक्षापैकी एकही पक्ष जळणार नाही याची पूर्ण दक्षता घेऊन नियोजन केलेले आहे. त्यासाठी ठिबकद्वारे पाणी देण्याची व्यवस्था केली आहे. वृक्ष लागवड करण्यासाठी धाराशिव शहरातील नागरिक, मंदिर संस्थांचे ट्रस्टी, विद्यार्थी व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व उपस्थितांचे आभार महेश पोतदार यांनी मानले.

**या लागवडीत आयुर्वेदिक वृक्ष गार्डन, बॉटनिकल वृक्ष गार्डन, फ्लॉवर्स गार्डन, अन्नपुर्णा फ्रुटस गार्डन, नक्षत्र वृक्ष गार्डन, ग्रास, रुट गार्डन, धर्म गार्डन (सर्व धर्मातील पवित्र वृक्ष), दुर्मिळ वृक्ष गार्ड, डेन्स फॉरेस्ट, तिर्थणकर वृक्ष गार्डन, राज्य वृक्ष गार्डन, इसापुर राजा गार्डन, ध्यानकेंद्र, व्यु पॉईट व ध्यान केंद्र, पक्षी पानवठा केला आहे.**

## पद्मावती महिला नागरी सहकारी पतसंस्था सभासदांना ६ टक्के लाभांश देणार – देवकते





धाराशिव दि. ३० (प्रतिनिधी) – येथील पद्मावती महिला नागरी सहकारी पतसंस्थेची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात दि.२९ सप्टेंबर रोजी पार पडली. या बैठकीत चेअरमन शकुंतला देवकते यांनी सभासदांना ठेवीच्या प्रमाणात ६ टक्के लाभांशाचे वाटप करण्यात येणार असल्याची घोषणा केली.

धाराशिव येथील मेघ मल्हार हॉटेलमध्ये या सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या अध्यक्षस्थानी बँकेच्या चेअरमन शकुंतला देवकते तर प्रमुख पाहुणे म्हणून नारायणदास भन्साळी, बँकेच्या उपाध्यक्षा रिमा नवगिरे, संचालिका गंगोत्री कुऱ्हाडे व सुनिता देवकते आदी उपस्थित होते. या बँकेचे ७३१ आहेत. तर एकूण भाग भांडवल ७ लाख ६८ हजार ६०० रुपये व गंगाजळी ७ हजार २१० रुपये असून इमारत निधी ५७ हजार रुपये आहे. तर ठेवी ९९ लाख ३२ हजार ३९९ रुपये आहेत. तर कर्ज ७० लाख ४६ हजार ८४३ रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. २०२३– २४ या आर्थिक वर्षातील अहवालाचे वाचन रिमा नवगिरे यांनी केले. यावेळी नारायणदास भन्साळी, सुरेंद्र पाटील, वागतकर यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन बँकेचे मार्गदर्शक दीपक देवकते यांनी व उपस्थितांचे आभार अमित देवकते यांनी मानले. या बैठकीस बँकेचे सर्व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चर्मकार समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी १ ऑक्टोबरला आझाद मैदानावर धडकणार प्रचंड मोर्चा – नितीन शेरखाने

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाचे थकीत कर्जमाफ करण्यात यावे, संत रविदास महाराज यांच्या नावे विद्यापीठ सुरू करण्यासाठी १०० एकर जमीन व निधी त्वरित देण्यात यावा यांसह इतर विविध प्रलंबित मागण्यांसाठी मुंबई येथील आझाद मैदानावर दि.१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा प्रचंड मोर्चा धडकणार असल्याची माहिती राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष नितीन शेरखाने यांनी दिली.

पुढे बोलताना शेरखाने म्हणाले की, राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्यावतीने शासनाकडे वारंवार समाज हिताच्या मागण्या करण्यात आल्या. मात्र त्या मागण्यांची पूर्तता न केल्यामुळे त्या तशाच प्रलंबित आहेत. यामध्ये संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त सार्वजनिक सुट्टी देण्यात यावी तर संत रविदास कौशल्य विकास बार्टी प्रमाणे सुरू करून बार्टीच्या धरतीवर स्वतंत्रपणे केंद्रे सुरू करण्यात यावीत. तसेच संत रविदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळावर अध्यक्ष व संचालक मंडळ नेमण्यात यावे आणि संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळात असलेले कॉन्ट्रॅक्ट बेसिसवरील कर्मचारी रद्द करून चर्मकार समाजाच्या मुलांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाला मुंबई येथे प्रशस्त मुख्य कार्यालय देण्यात यावे, चर्मकार समाजाचा आयोग सुरू करून त्यावर अध्यक्ष नेमण्यात यावा, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळास कर्ज प्रकरणासाठी असलेल्या जाचक अटी रद्द करून अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर कर्ज प्रकरणी त्वरित मंजूर करण्यात यावीत. तसेच संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्यावतीने प्रलंबित असलेले कर्ज प्रकरणे त्वरित निकाली काढण्यात यावीत. जर संत रोहिदास सर्वोद्योग व चर्मकार विकास महामंडळाला प्रत्येक जिल्ह्यात अद्ययावत असे कार्यालय देऊन जिल्हा व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांची भरती करण्यात यावी. तर मुंबईसह राज्यातील गटई कामगारांना पीच परवाने त्वरित देण्यात यावेत. तसेच राज्यातील गटई कामगारांना गटई स्टॉलचे त्वरित वाटप करण्यात यावे. तसेच चर्मकार समाजातील विद्यार्थ्यांना अस्वच्छ व्यवसायाची शिष्यवृत्ती त्वरित देण्यात यावी व राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये संत रविदास भवनसाठी जागा उपलब्ध करून भवन बांधून देण्यात यावे. त्याबरोबरच २ लाख रुपयांपर्यंतची कर्ज प्रकरणे मंजूर करण्याचे अधिकार जिल्हा व्यवस्थापकांना देण्यात यावेत. तर संत रोहिदास विकास महामंडळाच्या कर्जाच्या जामीनाबाबतच्या जाचक अटी रद्द करण्यात याव्यात. तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघ चर्मकार समाजाच्या सामाजिक, आर्थिक व उद्योग



विकासासाठी गेल्या २८ वर्षांपासून सातत्याने महाराष्ट्रात कार्यरत आहे. त्यामुळे या राज्य महासंघासाठी मुंबई येथे कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी आदी मागण्यांसाठी या मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चामध्ये जास्तीत जास्त चर्मकार बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष नितीन शेरखाने यांनी केले आहे.

## आमदार कैलास पाटलांनी शहर व ग्रामीण विकासाची कोणती कामे केली – सुधीर पाटील



धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – ग्रामीण व शहरी भागाची दुरावस्था झाली आहे. शहरासह ग्रामीण भागातील रस्ते उखडले आहेत. कळंब येथे संपर्क कार्यालय स्थापन केले नाही. तर ग्रामीण भागातील जनतेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मंत्रालयात स्वतंत्र स्वीय सहाय्यक (पी.ए.) नियुक्त करणे आवश्यक असते. इतर आमदारांचे स्वीय सहाय्यक मंत्रालयात जनतेची कामे करतात. तसेच आमदार झाल्यापासून आजपर्यंत धाराशिव – कळंब मतदार संघाच्या विकासासाठी वेगवेगळ्या हेडखाली विकास निधी आणण्यासाठी किती व कोणत्या विभागाकडे प्रयत्न केलेत ? याची माहिती पत्रकार परिषद घेऊन जनतेला द्यावी, असे खुले आव्हान शिवसेना (शिंदे) चे जिल्हा संघटक सुधीर पाटील यांनी दि.२९ सप्टेंबर रोजी दिले.

धाराशिव येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलच्या प्रशासकीय भवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पुढे बोलताना पाटील म्हणाले की, मागील ४ दिवसांखाली आ कैलास पाटील यांनी धाराशिव शहरातील रस्ते, पथदिवे व पाणी पुरवठा याबाबत जिल्हाधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन याबाबींकडे लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. आजपर्यंत शहरासह ग्रामीण भागाच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी लोकप्रतिनिधी या नात्याने नगर परिषद व जिल्हा परिषदे प्रशासनासोबत किती बैठका घेतल्या ? असा सवाल त्यांनी विचारला. तसेच त्यांनी आजपर्यंत एखादे कोणतेही विकासाचे ठोस काम केलेले असेल ते दाखवावे. तर दीड वर्षाच्या काळामध्ये एक तरी बैठक घेतली का असे आव्हान देखील त्यांनी दिले. विशेष म्हणजे त्यांनी आयटी विभाग ठेवला असता तर दीड महिन्यामध्ये प्रत्येक गावचा आढावा घेऊन त्या भागातील प्रश्न तात्काळ सोडविता आले असते. मात्र त्यांनी अशा प्रकारची कुठलीही व्यवस्था किंवा सुविधा उपलब्ध केली नसल्याचा आरोप केला. धाराशिव शहरातील भुयारी गटार योजनेअंतर्गत जी पाईपलाईन केली त्यामुळे रस्ते उघडले असून त्या रस्त्याची त्याच्या करण्यासाठी दीड कोटी रुपये निधी आला असून तो कुठे गेला व कशासाठी खर्च केला ? असा प्रश्नही त्यांनी विचारला.

**प्रभावी... शब्दाचा अर्थ समजून घ्यावा !**

धाराशिव शहरात आमदार कैलास पाटील यांचे... भावी अनेक प्रभावी एक...... डिजिटल चौकाचौकात लावले असल्याचे सांगत ते म्हणाले की, प्रभावी या शब्दाचा अर्थ आ पाटील यांना समजला आहे का ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. माझा शिवसेना पक्षामध्ये संघटन बांधण्याचा दांडगा अनुभव आहे. तर आ पाटील यांचा आमदार म्हणून फक्त पाच वर्षाचा अनुभव आहे. प्रभाव दाखविण्यासाठी ग्रामीण भागात जाऊन तेथील नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी पाठपुरावा करण्यासाठी प्रयत्न करणे व त्या समस्या सोडविणे, या कृतीला प्रभावी म्हणतात असा मार्मिक टोला त्यांनी लगावला.

मी शिवसेना (शिंदे) पक्षात प्रवेश केल्यापासून शिवसेनेच्या शाखा स्थापन करण्याचे काम सुरू केले आहे. आजपर्यंत २८ शाखा स्थापन केल्या असून उर्वरित गावात देखील शाखा स्थापन करणार असल्याचे त्यांनी सांगितले. मी प्रत्येक गावात जाऊन ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेत आहे. मी पूर्वीच्या शिवसेनेचा जिल्हाप्रमुख असताना देखील अशाच पद्धतीने काम केले असल्यामुळे जुने शिवसैनिक आवर्जून भेट घेऊन त्यांच्या अडीअडचणी सांगत आहेत. तसेच मी या मतदार संघातून निवडणूक लढणार असल्यामुळे काही शिवसैनिक तर उघडपणे (ठाकरे) चे असताना देखील ते मला सहकार्य करणार असल्याचे ठाम आश्वासन देत आहेत. त्यामुळे आमदार कैलास पाटील यांनी पर्यायी पक्ष शोधावा असा उपरोधक सल्ला त्यांनी दिला.

## आचार संहितेपूर्वी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ द्या – ॲड. भोसले

धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी विदर्भ व मराठवाडा वैधानिक विकास मंडळांना मुदत वाढ देण्याचा प्रस्ताव केंद्रीय गृहमंत्रालयात गेल्या २ वर्षांपासून पडून असतानाही त्याकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तीव्र आकस व मराठवाड्याच्या विकास कामात खोडा घालण्यासाठीच वैधानिक विकास मंडळाच्या मुदतवाढीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप समाजवादी पार्टीचे प्रदेश महासचिव तथा प्रवक्ते ॲड. रेवण भोसले यांनी केला आहे

३० एप्रिल २०२० रोजी वैधानिक विकास मंडळाची मुदत संपली आहे. या मंडळांना मुदतवाढ न दिल्यास निधी वाटपात विदर्भ व मराठवाडा यावर अन्याय होण्याची भीती निर्माण झाली आहे. विकास खर्चाचे समान वाटप, साधन संपत्तीचे न्याय्य वाटप आणि सर्व विभागांचा समतोल विकास साधण्याच्या उद्देशाने प्रादेशिक वैधानिक विकास मंडळाची स्थापना करण्यात आली होती. या मंडळाच्या स्थापनेमागचा मूळ उद्देश सफल व्हावा आणि विदर्भ, मराठवाड्याच्या जनतेला योग्य न्याय मिळण्यासाठी वैधानिक विकास मंडळांना आचारसंहितेपूर्वी मुदतवाढ देणे अत्यंत गरजेचे असल्याचे स्पष्ट मत ड भोसले यांनी व्यक्त केले आहे. या आधी २ मे १९९४ रोजी दांडेकर समितीच्या अहवालानुसार विदर्भ, मराठवाड्याच्या विकासाचा असमतोल दूर करण्यासाठी घटनेच्या ३७१ (२)या कलमानुसार विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाची पहिल्यांदा स्थापना करण्यात आली होती. तर १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान हे निजामी राजवटीतून भारतात एक राज्य म्हणून सामील झाले. निजामाच्या काळात राहिलेले मागासलेपण कमी करण्यासाठी पावले उचलली जावीत अशी येथील लोकांची अपेक्षा होती. विदर्भ व मराठवाडा या दोन्ही प्रदेशातील लोकांच्या अपेक्षानुसार सामान्य नागरिकांना रोजगाराच्या नव्या संधी मिळणे, त्यासाठी उद्योग क्षेत्र वाढवणे, जिल्हानिहाय लोकांचे सरासरी दरडोई उत्पन्न वाढवणे, गोदावरी नदीच्या पाण्याचा न्याय्य वाटा मराठवाड्याला मिळवून देणे, शासकीय अनुदानाचा न्याय्य वाटा देऊन विकासाचा विभागीय



असमतोल दूर करणे अपेक्षित होते. विरोधी पक्ष नेते असताना देवेंद्र फडणवीस यांनी वैधानिक महामंडळे बरखास्त केले जाणार नाहीत तर त्यांना मुदतवाढ दिली जाईल असे सभागृहातच आश्वासन दिले होते त्यामुळे ते आता विद्यमान सरकारमध्ये स्वतः गृहमंत्री असल्यामुळे त्यांनी केंद्रीय गृह मंत्रालयकडे पाठपुरावा करून वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्यासाठी स्वतः लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. या प्रादेशिक विकास मंडळांना मुदतवाढ दिली तर राज्यपाल अधिक शक्तिशाली होतील याकडे दुर्लक्ष करून केवळ या विभागाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी आचार संहितेपूर्वी वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्यात यावी अशीही मागणी ॲड. भोसले यांनी केली आहे.



# देगलूर महाविद्यालयात तालुकास्तरीय ग्रंथालय प्रदर्शन

देगलूर(प्रतिनीधी) : येथील गट साधन केंद्र पंचायत समिती देगलूरच्या वतिने महावाचन उत्सव २०२४ उपक्रमा अंतर्गत ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

देगलूर महाविद्यालयात आज ३० सप्टेंबर रोजी झालेल्या तालुकास्तरीय ग्रंथालय प्रदर्शनाचे उद्घाटन देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मोहन खताळ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी गट साधन केंद्र पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी तोटरे डी.आर., शिक्षण विस्तार अधिकारी शिवशंकर झंपलवाड, राजेश्र्वर किसवे शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती दशरथ पांचाळ, तलवारे आर.एस. टोके पी.आर. , चैनपुरे व्ही. व्ही देगलूर महाविद्यालय ग्रंथालयाचे ग्रंथपाल साईनाथ शिंदे ,उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, पर्यवेक्षक एस एन पाटील प्रा.महेश कुलकर्णी प्रा. शिवचरण गुरूडे, प्रा. सिताराम हाके वरिष्ठ लिपीक दत्तप्रसन्न साखरे आदी उपस्थित होते यावेळी तालुक्यातील तसेच शहरातील शाळेनी आपल्या ग्रंथालयातील पुस्तके आणून येथे प्रदर्शनास ठेवली होती तालूका व शहरातील शाळेतील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा, ग्रंथालयाचा परिसर, वाचन कक्ष, ग्रंथदालन व ग्रंथ प्रदर्शनास भेट दिली.

# शरद पवार गटाकडून विधानसभा लढविणाऱ्यांची भाऊगर्दी

पुणे : प्रतिनिधी- अजित पवार यांच्या राष्ट्रवादी गटाच्या विरोधात लढण्यासाठी शरद पवार यांच्याकडे इच्छुक उमेदवारांची गर्दी झाली आहे. त्यामुळे येणा-या विधानसभा निवडणुकीत पवार विरुद्ध पवार असा सामना रंगण्याची चिन्ह दिसत आहेत.



दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकीसाठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस विरोधात लढण्यासाठी शरद पवार यांच्या गटातून अनेक उमेदवार इच्छुक असल्याने या उमेदवारांच्या अर्जाची भाऊगर्दी झालेली दिसत आहे.

अमळनेरमध्ये अजित पवार गटाचे अनिल पाटील यांच्या विरोधात लढण्यासाठी शरद पवार यांच्याकडे २९ इच्छुक उमेदवारांचे अर्ज आले आहेत. परळीत धनंजय मुंडे यांच्या विरोधात १३ इच्छुकांचे अर्ज आले आहेत. उदगीरमध्ये संजय बनसोडेंच्या विरोधात १२ अर्ज आले आहेत. तर येवल्यातून छगन भुजबळ यांच्या विरोधात ११ इच्छुकांनी अर्ज दिले आहेत.

कागलमध्ये हसन मुश्रीफ यांच्या विरुद्ध लढण्यासाठी ८ इच्छुक आहेत. आहेरीत धर्मरावबाबा आत्राम यांच्या विरोधात ७ इच्छुकांचे अर्ज आहेत.त्याचबरोबर आंबेगावातून दिलीप वळसे पाटील यांच्या विरोधात ३ अर्ज आले आहेत. त्यामुळे शरद पवार यांच्या गटाकडून विधानसभा लढवणा-यांची गर्दी वाढत आहे. आगामी विधानसभेत यामुळे अजित पवार यांच्या गटाला धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# दयानंद विज्ञानमध्ये महाविद्यालयस्तरीय आविष्कार स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर : दि.२६ सप्टेंबर २०२४ रोजी पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव -२०२५ च्या पूर्व तयारीच्या दृष्टीने दयानंद विज्ञान महाविद्यालयामध्ये म आविष्कार-२०२५ पूर्व तयारी स्पर्धेचे म आयोजन सेमिनार हॉलच्या समोर करण्यात आलेले होते.या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या शुभ हस्ते झाले.सदरील महाविद्यालयस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत एकूण ८६ स्पर्धकांनी आपले इनोव्हेटिव्ह प्रोजेक्ट सादर केले तसेच यावेळी संशोधक विद्यार्थ्यांनी विविध विषयावर तयार केलेल्या प्रोजेक्ट,पोस्टर मॉडेलचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व सर्व विभाग प्रमुख,विविध विभागातील प्राध्यापकांनी निरीक्षण केले. प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेले प्रोजेक्ट हे त्यांची संशोधन वृत्ती वाढविण्याच्या दृष्टीने व समाजोपयोगी संशोधनासाठी निश्चितच महत्त्वाचे आहेत,असे सांगितले. सदरील स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ.युवराज सारणीकर,डॉ. चंद्रशेखर स्वामी,डॉ.राहुल मोरे,डॉ.श्रेयश माहुरकर,डॉ. कोमल गोमारे,डॉ.शंकर बिराजदार यांनी परीक्षक म्हणून उत्तमरित्या काम पाहिले. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी आविष्कार स्पर्धा समन्वयक व संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रोहिणी शिंदे,सहसमन्वयक डॉ. विश्वनाथ मोटे तसेच सदस्य डॉ.महादेव पंडगे,डॉ.महेश करळे,प्रा.श्वेता मदने आणि सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थांनी परिश्रम घेतले.

# पंधराशे रुपयांनी प्रश्न सुटणार नाहीत, ठोस उपाययोजना राबवाव्यात : अंधारे

## बहुजन नारी सन्मान हक्क परिषदेस प्रतिसाद




**लातूर / प्रतिनिधी-** कष्टकरी महिलांच्या मागण्यांकडे राजकीय पक्षांनी गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. बहुजन समाजातील कष्टकरी महिलांचे प्रश्न राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात येणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पंधराशे रुपयांनी आपले प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी सरकारने महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस उपाययोजना राबवणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवसेना ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी रविवारी येथे बोलताना केले.

येथील बहुजन महिला हक्क श्रमिक संघटनेच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क या ठिकाणी बहुजन नारी सन्मान हक्क परिषदेत अंधारे बोलत होत्या. अध्यक्षस्थानी बहुजन महिला हक्क श्रमिक संघटनेच्या अध्यक्ष लक्ष्मी कांबळे होत्या. यावेळी अंधारे म्हणाल्या, बहुजन महिलांसाठी स्वतंत्र आयोगाची स्थापना करावी. बहुजन कष्टकरी महिलांच्या पाल्यांसाठी दर्जेदार शिक्षणाची सोय करावी. कष्टाला योग्य दाम मिळावा. या मागण्यांच्या पूर्ततेसाठी मी आपल्या पाठिशी आपली शिपाई म्हणून खंबीरपणे उभी राहणार असल्याची ग्वाही त्यांनी उपस्थित कष्टकरी महिलांना दिली. जो पक्ष आपल्या मागण्या मान्य करण्याबद्दल सकारात्मक राहील त्याच पक्षाच्या पाठीमागे आपण राहावे. सरकार दरबारी आम्ही पाठपुरावा करू, असेही त्यांनी सांगितले. महिलांच्या अंधश्रध्देवरही बोलताना अंधारे म्हणाल्या, तुम्ही अंधश्रध्देच्या पोटी पैसे खर्च करण्यापेक्षा स्वतः च्या लेकरांच्या शिक्षणावर पैसे खर्च करा. आपली एकजूट राहिली तर आपले प्रश्न लवकर सुटतील, असा विश्वासही त्यांनी उपस्थित महिलांना दिला. अध्यक्षीय समारोपात लक्ष्मी कांबळे यांनी कष्टकरी महिलांचे प्रश्न मांडून ते सोडविण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा, अशी विनंती प्रा. अंधारे यांना केली. सूत्रसंचालन प्रा. विद्या कांबळे यांनी केले. या परिषदेत विविध ठराव पारित करण्यात आले. परिषदेस महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# दयानंद विज्ञानच्या ग्रीन क्लब विद्यार्थ्यांचा वृक्ष लागवड व परिसर स्वच्छता मोहीमेत उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील ग्रीन क्लबच्या विद्यार्थ्यांनी वृक्ष लागवड व परिसर स्वच्छता मोहीमेत उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.सदरील मोहिमेत पार्थ हॉटेलपासून साई नाक्यापर्यंत परिसर स्वच्छ्ता आणि वृक्ष लागवड करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रीन क्लब समन्वयक डॉ.अमोल ठोसर तसेच रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सुरज कोल्हे,ग्रीन क्लबचे सदस्य हरिदास शिरुरे, शिवसुदर्शन घुगे,यश झंवर अशा अनेक विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.या मोहिमेत आमचं ग्रीन वृक्ष फाऊंडेशन यांच्याही सदस्यांचा समावेश होता.महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये म हरित लातूर,स्वच्छ व सुंदर लातूर म ही भावना रूजविणे हा परिसर स्वच्छता व वृक्ष लागवड उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

## आत्मबोध २४

रोग नाहीसे व्हावे ।
त्यास औषध द्यावे ।
ते गोड असावे ।
कसे शक्य ।। १ ।।

औषधात नाही शक्य ।
रोग संपणे अशक्य ।
भवरोगात मात्र शक्य ।
नक्की आहे ।। २ ।।

भवरोग ज्यास झाला ।
संतांचे औषध त्याला ।
भवरोग दूर पळाला ।
निश्चितच ।। ३ ।।

संत औषधाचे झाड ।
रुचकर आणि गोड ।
पडे भवरोगावर धाड ।
निश्चितच ।। ४ ।।

सिद्धदास, सोलापूर
८/०२/२०२२

# आलमला येथील ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल चा खाजगी विभागातून जिल्ह्यात दुसरा क्रमांक

लातूर / प्रतिनिधी- मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक दोन या शालेय गुणवत्ता अभियानात लातूर जिल्ह्यातील स्वयं अर्थ सहाय्य च्या ३१६ शाळा, खाजगी विनाअनुदानित च्या ६९ शाळा, खाजगी अनुदानित च्या ७८४ शाळा, खाजगी अंशतः अनुदानित च्या ६४ शाळा, समाज कल्याण खाजगी अनुदानित च्या ५७ शाळा, समाज कल्याण खाजगी विनाअनुदानित च्या १२ शाळा, समाज कल्याण खाजगी विभागाच्या च्या ७ शाळा, विमुक्त जाती जमाती खाजगी अनुदानित च्या ६३ शाळा अशा एकूण १३७२ खाजगी शाळांमधून ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल शाळेचा जिल्ह्यात द्वितीय क्रमांक आलेला आहे.

या अभियानाअंतर्गत ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल आलमलाचा तालुकास्तरीय प्रथम क्रमांक व जिल्ह्यातून द्वितीय आल्याबद्दल शिक्षण विभाग पंचायत समिती औसाच्या वतीने आ. अभिमन्यु पवार साहेबांचे हस्ते व गटविकास अधिकारी म्हेत्रे साहेब, गटशिक्षण अधिकारी राठोड साहेब पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे विश्वेश्वरय्या पॉलीटेक्निकचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, तालुक्यातील सर्व केंद्रांचे केंद्रप्रमुख, सर्व केंद्रीय मुख्याध्यापक, मुख्याध्यापक तसेच सर्व शाळेचे शिक्षक व शिक्षिका यांच्या उपस्थितीत ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल च्या प्राचार्या सौ स्वाती कापसे मॅडम व सर्व कर्मचारी यांना प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

औसा तालुक्यातील आलमला येथील ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल या शाळेने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात जिल्ह्यातून दुसरा येण्याचा बहुमान पटकावला आहे. त्यामुळे शाळेच्या विविध उपक्रमाचे जिल्हाभरातून कौतुक होत आहे.

आलमला येथील ब्ल्यू बर्ड इंटरनॅशनल स्कूल मध्ये नर्सरी ते बारावी पर्यंतचे वर्ग चालतात. शाळेमध्ये जवळपास ८०० च्या वर विद्यार्थी संख्या असून २५ शिक्षक कार्यरत आहेत, अनेक उपक्रम राबवून शाळेने हा यशाचा टप्पा गाठला आहे. शाळेने सर्व निकष पूर्ण करत जिल्ह्यात स्वतःची ओळख निर्माण केली आहे.

परसबाग, खत निर्मिती, प्रयोगशाळा, वाचनालय, स्वच्छता मॉनिटर ,अंधश्रद्धा निर्मूलन ,निरनिराळी वृक्ष लागवड , वृक्षांची संवर्धन व जतन, पुस्तक पेढी ,वाचन उत्सव ,मेरी माटी मेरा देश , धूळपाटी उपक्रम ,टाकाऊ पासून टिकाऊ ,नेमबाजीतून गणित शिक्षण ,भारत भ्रमण भूगोल, संगणक लॅब ,सोलर पॅनल, बचत बँक , अबॅकस क्लासेस, विज्ञान प्रदर्शन , ऑलिंपियाड परीक्षा ,शिष्यवृत्ती परीक्षा , विविध शालेय समिती, आनंददायी शनिवार, तंबाखू मुक्त शाळा,बाला उपक्रम, आरोग्य जनजागृती रॅली, मतदान जागृती रॅली, असाक्षरता सर्वेक्षण, माता पालक यांच्यासाठी हळदी कुंकू कार्यक्रम,पालक मेळावा ,संगीत व कराटे क्लासेस, मेहंदी क्लास, विविध क्षेत्र भेटी, शैक्षणिक सहल, वार्षिक स्नेसंमेलनाचे आयोजन असे विविध उपक्रम शाळेमध्ये राबवले जातात. तसेच शालेय परिसरातील प्रत्येक वृक्ष हा विविध वर्गाला दत्तक देण्यात आले असून त्या वृक्षाचे जतन व पालनपोषण त्या वर्गातील विद्यार्थी व शिक्षक मिळून करतात, बाला उपक्रमांतर्गत प्रत्येक झाडांना विविध गणितीय आकृत्यांच्या आकाराचे आळे बनविण्यात आले आहेत, प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांनी बनविलेले शैक्षणिक साहित्य लावण्यात आलेले आहेत तसेच प्रत्येक शनिवारी विद्यार्थ्यांसाठी उपक्रम घेतले जातात.




शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती कापसे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी हे यश संपादन करण्यासाठी खूप मेहनत घेतली तसेच सर्व स्तरातून या शाळेचे कौतुक होत आहे . त्यासाठी संस्थेचे अध्यक्ष शिवचरणजी धाराशिवे , उपाध्यक्ष प्रभाकरजी कापसे , सचिव बस्वराजजी धाराशिवे , सहसचिव महादेवजी खिचडे व्यवस्थापक योगेशजी धाराशिवे, शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसीचे प्राचार्य कैलास कापसे, विश्वेश्वरय्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य गोपाळ दंडिमे, ब्लू बर्ड जुनिअर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर, विभाग प्रमुख , प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शाळेचे खूप कौतुक केले. या शाळेच्या यशस्वीतेसाठी विनोद पांडुळे, हलिमा अरब, मंजुरपाशा शेख, सौरभ वडे, तानाजी जाधव, फिदरोस सय्यद, अजित ढोले, अजय पाटील, नितु भंडारी, मिनहाज शेख, परमेश्वर चिलखे, रश्मी दुधनकर, सुप्रिया कांबळे, नाजमिन सय्यद, गिता चव्हाण, पायल घायाळ, वैष्णवी देवकने, मयुरी सुर्यवंशी, दिपक खोजे, शरद साळुंके, जवादे महारूद्र, महम्मद मुलानी, आशा राठोड, नौशाद फकीर, सतिष निलंगेकर, शोभा कांबळे यांनी अथक परिश्रम घेतले.



# अडत व्यापारी शिक्षण संस्थेच्या सचिवपदी डॉ. कर्मवीर उनग्रतवार यांची निवड

देगलूर(प्रतिनीधी) : अडत व्यापारी शिक्षण संस्थेच्या सचिवपदी डॉ. कर्मवीर उनग्रतवार यांची काल बिनविरोध निवड करण्यात आली.

शशिकांत नारायणराव चिद्रावार यांच्या निधनामूळे रिक्त झालेल्या सचिव पदावर काल रविवारी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत डॉ. कर्मवीर उनग्रतवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या निवडीबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य देवेंद्र मोतेवार, नारायणराव मैलागिरे, सूर्यकांत नारलावार, , गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर, गोविंदप्रसाद झंवर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ , उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, पर्यवेक्षक संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक , कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

# सोसायटीच्या प्रत्येक सभासदांना ५० किलो साखर व १५ टक्के लाभांश वाटप करणार-चेअरमन डॉ.गोविंदराव माकणे

## सोसायटीची ६८ वी सर्वसाधारण सभा संपन्न

चाकूर ता.प्रः- चाकूर येथील विशाल विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था तालुका चाकूर मर्यादित या सोसायटी कडून या वर्षापासून सोसायटीच्या प्रत्येक शेतकरी सभासदांना पंधरा टक्के प्रमाणे लाभांश वाटप करण्यात येणार आहे. असे आज ६८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सोसायटीचे चेअरमन गोविंदराव माकणे यांनी सांगितले.

या विशाल सोसायटीची ६८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आज दिनांक २६ सप्टें २४ रोजी सकाळी ११ वा. सोसायटीच्या प्रांगणात घेण्यात आली. त्याप्रसंगी या सोसायटीचे चेअरमन गोविंदराव माकणे यांनी प्रत्येक सभासदांना साडेबारा टक्क्या ऐवजी १५% लाभांश वाटपाची घोषणा करण्यात आली. तसेच येणारा दिवाळी हा सण प्रत्येक सभासदांचा उत्साहात



साजरा व्हावा म्हणून बाजार भावापेक्षा तीन रुपये कमी दराने प्रत्येक सभासदांना ५० किलो साखर देण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. तसेच औषध खते बी बियाणे खरेदीवर ११ सभासदांना प्रोत्साहन अनुदान वाटप करण्यात आले. या सोसायटीची प्रत्येक क्षेत्रात कौतुकास्पद कामगिरी असल्याचेही सांगितले. तसेच सोसायटीच्या प्रत्येक कर्मचाऱ्यांना भेटवस्तूही देण्यात आली. या सभेच्या वेळी वार्षिक सर्वसाधारण सभेचा अहवाल या सोसायटीचे मॅनेजर कपिल अलमाजी यांनी वाचले तर शेतकरी सभासदांच्या प्रश्नांना सोसायटीचे चेअरमन गोविंदराव माकणे यांनी उत्तरे दिली. तर आभार शिरीष येडले यांनी मानले.

यावेळी व्हाईस चेअरमन बालाजी तलवारे यांच्यासह संचालक राधाकिशन तेलंग, शिरीष येडले, अजय नाकाडे, मन्मथ पाटील, दिगांबर मोरे, हनमंत उस्तुर्गे, दिलीप गोलावर, अनिता अलमाजी, निर्मला फुलारी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सभासदही मोठ्या संखेने उपस्थित राहून जेवणाचा स्वाद घेत होते.

# गणेश सावळकर यांना महाराष्ट्र शासनाचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

रेणापूर:जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हाकेतांडा ता. रेणापूर जिल्हा लातूर येथे कार्यरत, विद्यार्थी प्रिय, उपक्रमशिल शिक्षक, बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य प्रसिध्दीप्रमुख, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवलेले, ५० वेळेस रक्तदान, विरशैव ककय्या समाजाच्या सामुहिक विवाह सोहळ्याचे यशस्वी आयोजक, समाजभूषण, नेत्रदानाचा संकल्प, शाळेत अनेक उपक्रमाचे आयोजन,रात्रशाळा, सर्व विद्यार्थीचे इंग्रजीचे वाचन, गाव सहभागातून शाळेचा कायापालट केला.

या सर्व कामांची दखल घेऊन लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर साहेब, डायटच्या प्राचार्या भागीरथी गिरी, जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी वंदनाताई फुटाणे यांच्या निवड समितीने विद्यार्थी प्रिय शिक्षक गणेश राणबा सावळकर यांची जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड केली.या निवडीबद्दल त्यांचे रेणापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, बीडचे शिक्षणाधिकारी संजय पंचगले, रेणापूरचे गटशिक्षणाधिकारी धनराज गीते, समस्त ककय्या महासंघाचे राज्याध्यक्ष ड. जांबुवंतराव सोनकवडे, बहुजन शिक्षक महासंघाचे राज्याध्यक्ष गौतम टाकळीकर, जाकीर शेख,चर्मकार महासंघाचे केंद्रीय उपाध्यक्ष सी.के.मुरळीकर, जिल्हाध्यक्ष रवी कुरील,ककय्या समाजाचे जिल्हाध्यक्ष,व रोटरी क्लबचे अध्यक्ष श्रीमंत कावळे, आप्पाराव कावळे, संजय सोनकांबळे,दिगंबर खरटमोल,रेणापूर शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन गोपाळ पडिले, पत्रकार विठ्ठल कटके, बम्हदास येमले,बहुजन शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष दिनेश कांबळे, मा. स्विकृत सदस्य शिक्षक संसदचे जिल्हाध्यक्ष मंगेश सुवर्णकार,शिवाजी पात्रे,संभाजी गुळवे,त्र्यंबक राठोड,काशिनाथ राठोड, संजय चव्हाण यांनी अभिनंदन केले आहे.

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५0% |
| ४६ ते १८0 दिवस | ७.५0% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५0% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १0.५0% |
| ३६ महिने ते ६0 महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १0% |


**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** 0.५0% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.



# यशवंत

मंगळवार दि. १ ऑक्टोंबर २०२४

# उदगीर




कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# उदगीरच्या इतिहासातील सर्वात बेस्ट आमदार; माझ्या परीक्षेत उत्तीर्ण

## ना. अजित पवारांकडून ना. संजय बनसोडे यांचे तोंडभरुन कौतुक








**राम मोतीपवळे**

**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीरच्या इतिहासातील सर्वात बेस्टआमदार, ज्यांनी हजारो कोटीची विकासकामे केली, ते राज्याचे क्रीडा व युवक कल्याण बंदरे मंत्री संजय बनसोडे आ-हेत. माझ्या परीक्षेत ते उत्तीर्ण असून त्यांचे कार्य अप्रतिम आहे. असे तोंडभरून कौतुक राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांचे उदगीर येथे आयोजित जनसन्मान यात्रेत केले. यावेळी, मंचावर कृषी मंत्री धनंजय मुंडे, आ.विक्रम काळे, आ.बाबासाहेब पाटील, उपस्थीत होते, अॅड. व्यंकट बेद्रे, अफसर शेख, बाजार समितीचे माजी सभापती सिध्देश्वर पाटील, शेख समिर, बालाजी भोसले, बाळासाहेब मारलापल्ले, प्रा. प्रविण भोळे आदि उपस्थित होते.

मागचे बिल द्यायचे नाही, आणि पुढचे बिल भरायचे नाही म्हणत राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी उदगीर येथील जाहीर सभेत शेतकऱ्यांची मने जिंकली. माय माउलींनो काळजी करू नका लाडकी बहिण योजना कधीच बंद होणार नाही. चंद्रसूर्य असेपर्यंत कुणीच भारताचे संविधान बदलू शकणार नाही, बार्टीच्या धर्तीवर आर्टी व मार्टी सारख्या योजना सुरू केल्या त्यामुळे तळागाळातील जनतेला मोठा लाभ होणार आहे. अशी खूप कामे केले राहिलेले कामही आम्हीच करू असे आश्वासन उदगीर मतदारसंघातील जनतेला राज्याचे मुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

संजय बनसोडे यांनी माझ्याकडुन उदगीरसाठी जे मागितले ते मी त्यांना दिले. आता त्यांच्या ज्या काही मागण्या असतील त्या पूर्ण करायच्या असतील तर यावेळी संजय बनसोडे यांनाच निवडून द्यावे लागेल असेही त्यांनी सांगितले. शहरातील सर्व महा पुरुषाच्या पुतळ्यांना वंदन करून झालेल्या जाहीर सभेत हजारो महिलांनी व नागरिकांनी उपस्थिती लावली होती.

**युवक कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश**

मलकापुर ग्रा.पं.सदस्य महेश तोडकर, संदिप देशमुख, बबलु मुळे, बंटी अलमकेरे, सचिन आठाणे, कुलबुर्गे यांच्यासह १०० युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांनी प्रवेश केला.



# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उदगीर येथील विविध इमारती, विकास कामांचे लोकार्पण

## प्रलंबित व वादपुर्व प्रकरणात ४७ लाख ७० हजार २६५ रुपये तडजोड शुल्क वसूल..








**उदगीर (प्रतिनिधी)** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज उदगीर येथील विविध विकास कामांचे उद्घाटन करण्यात आले. शहरातील सुसज्ज प्रशासकीय इमारती, अटल अमृत उदगीर शहर पाणी पुरवठा योजना, कौळखेड व गुडसूर येथील वीज उपकेंद्रांचा यामध्ये समावेश आहे. तसेच उदगीर शहरातील भूमिगत गटार योजनेचे यावेळी भूमिपूजन करण्यात आले.

राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार विक्रम काळे, आमदार बाबासाहेब पाटील, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी सोहेल खान, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता बी. एस. पांढरे, अधिक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, माजी आमदार गोविंद केंद्रे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, उदगीर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

**✻तहसील व उपविभागीय अधिकारी कार्यालय✻**

उदगीर येथे नव्याने उभारण्यात आलेल्या तहसील कार्यालय व उपविभागीय कार्यालय इमारतीचे उद्घाटन उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते झाले. या इमारतीचे एकूण क्षेत्रफळ सुमारे २ हजार ८७६ चौरस मीटर आहे. यामध्ये तळ मजल्यावर वाहनतळ (पार्किंग), पहिल्या मजल्यावर तहसीलदार यांचा कक्ष, कॉन्फरन्स हॉल, कोर्ट रूम यासह विविध कक्ष, दुसऱ्या मजल्यावर अभिलेख कक्ष, ईव्हीएम स्ट्राँग रूम, बैठक सभागृह आणि इतर कक्ष आहेत. तिसऱ्या मजल्यावर उपविभागीय अधिकारी कार्यालय असून उपविभागीय अधिकारी यांच्या कक्षासह विविध कक्ष, कोर्ट रूम, कॉन्फरन्स हॉल आहे. या इमारतीसाठी सुमारे १० कोटी १९ लाख रुपये खर्च झाला आहे.

**✻पंचायत समिती इमारत✻**

उदगीर पंचायत समितीच्या नूतन इमारतीमध्ये एकूण चार मजले आहेत. एकूण जवळपास ३ हजार ११२ चौरस मीटर क्षेत्रफळ असलेल्या या इमारतीची उभारणी सुमारे २० कोटी १७ लक्ष रुपये निधीतून करण्यात आली आहे. गट विकास अधिकारी यांच्यासह विविध अधिकारी, पदाधिकारी यांचे सुसज्ज कक्ष, बैठक सभागृह या इमारतीमध्ये तयार करण्यात आले आहेत.

**✻उदगीर प्रशासकीय इमारत✻**

उदगीर येथे सुमारे १४ कोटी ९५ लाख रुपये निधीतून तीन मजली प्रशासकीय इमारत उभारण्यात आली आहे. या इमारतीचे एकूण बांधकाम क्षेत्रफळ सुमारे ५ हजार ५३२ चौरस मीटर असून तळ मजल्यावर वाहन तळ आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, वन विभाग, राज्य उत्पादन शुल्क, सहाय्यक दुय्यम निबंधक, कृषि विभागासह विविध शासकीय विभागांची कार्यालये या तीन मजली प्रशासकीय इमारतीमध्ये असतील.

**✻उदगीर उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस स्टेशन इमारत✻**

उदगीर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आणि उदगीर पोलीस स्टेशनसाठी सुमारे ३२ कोटी ५४ लक्ष निधीतून दोन मजली इमारत उभारण्यात आली आहे. या इमारतीचे एकूण क्षेत्रफळ जवळपास १० हजार ९५७ चौरस मीटर आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते फीत कापून व कोनशिलेचे अनावरण करून या इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. या इमारतीमध्ये तळमजला व पहिल्या मजल्यावर उदगीर शहर पोलीस स्टेशन आहे. तर दुसऱ्या मजल्यावर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय आहे. ही इमारत भूकंप रोधक असून सोलार, अग्निशमन यंत्रणा, अत्याधुनिक कारागृह, बैठक कक्ष, ठाणे अंमलदार कक्ष आदी सुविधांनी सज्ज आहे.

**✻गुडसुर आणि कौळखेड वीज उपकेंद्राचे लोकार्पण✻**

गुडसुर आणि कौळखेड येथे उभारण्यात आलेल्या ३३/११ केव्ही वीज उपकेंद्रांचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे लोकार्पण केले. गुडसुर येथील उपकेंद्रामुळे गुडसुर, डाऊळ, हिप्परगा, डोंगरशेळकी, कल्लुर व इस्मालपुर येथील ग्राहकांना सुरळीत आणि योग्य दाबाने विद्युत पुरवठा करणे शक्य झाले आहे. तसेच कौळखेड येथील उपकेंद्रामुळे जानापुर, शिरोळ, कौळखेड, मल्लापुर, गुर्धाळ, कुमदाळ व जवळपासच्या वाड्या-तांडे यांना उच्च दाबाने वीज पुरवठा होत आहे.

**✻अटल अमृत उदगीर शहर पाणी पुरवठा योजनेचे लोकार्पण✻**

उदगीर शहरासाठी पुढील ३० वर्षांची लोकसंख्या गृहीत धरून अटल अमृत उदगीर शहर पाणी पुरवठा योजनेच्या १०६ कोटी रूपयांच्या कामांना मंजूरी देण्यात आली. या योजनेसाठी नांदेड जिल्हातील उर्ध्व मण्यार प्रकल्पातील पाणी आरक्षित करण्यात आले. तसेच याठिकाणी उद्धव विहीर घेवून उदगीर शहरासाठी पाणी आणण्यात आले. या योजनेतून शहरात सुमारे १४ हजार नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तसेच बनशेळकी तलाव व हकनकवाडी जलशुध्दीकरण केंद्र येथे ५०० के. व्ही. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आले आहेत. या योजनेचे लोकार्पण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने झाले.

**✻उदगीर शहर भूमिगत गटार योजनेचे भूमिपूजन✻**महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत उदगीर शहर भूमिगत गटार योजनेच्या एकूण सुमारे ३४९ कोटी ८८ लाख रूपयांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार उदगीर शहर भूमिगत गटार योजनेच्या टप्पा-१ साठी १६१ कोटी ४ लक्ष रुपयांच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या कामाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.